दैनिक राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२७८ | गुरूवार, दि.३० जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये




## संपादकीय

### आश्वसानांची खैरात; कोन असणार दिल्लीपती?

सध्या दिल्लीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. 'आप'सह सारेच राष्ट्रीय पक्ष जोरदार तयारीला लागले आहेत. 'आप' आणि काँग्रेस स्वबळावर निवडणूक लढवत आहेत. आप, काँग्रेस आणि भाजप अशी तिरंगी लढत आहे. दिल्लीच्या ७० जागांसाठी एकाच टप्प्यामध्ये मतदान होणार आहे. मतदान ५ फेब्रुवारी रोजी होणार असून ८ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होईल. लोकसभा निवडणुकीत राजस्थानच्या फलोदी सट्टा बाजाराने काही अंदाज वर्तवले होते.

# इथेनॉल दरवाढीला केंद्रीय मंत्रिमंडळाचा हिरवा कंदील

## अर्थसंकल्पापूर्वी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सरकारची मोठी भेट

नवी दिल्ली । वृतसंस्था

केंद्रीय मंत्रिमंडळाने अर्थसंकल्पापूर्वी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठी भेट दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत पेट्रोलमध्ये मिश्रीत केल्या जाणाऱ्या इथेनॉलच्या किमती वाढवण्यात आल्या आहेत. पूर्वी सरकारी कंपन्या ५६.५८ रुपये प्रति लिटर दराने इथेनॉल खरेदी करायच्या. आता तेच



इथेनॉल ५७.९७ रुपये प्रति लिटर दराने खरेदी केले जाईल. म्हणजेच इथेनॉलच्या किंमतीत ३ टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे. याचा थेट फायदा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना होणार आहे.

मंत्रिमंडळाच्या निर्णयाची माहिती देताना केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, सरकारने इथेनॉलसाठी नवीन दर निश्चित केले आहेत. उसाच्या रसापासून तयार होणाऱ्या इथेनॉलची किंमत प्रति लिटर ६५.६१ रुपये, बी–हेवी गुळीपासून तयार होणाऱ्या इथेनॉलची प्रति लिटर ६०.७३ रुपये आणि सी–हेवी गुळीपासून तयार होणाऱ्या इथेनॉलची किंमत प्रति लिटर ५७.९७ रुपये असेल. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे इथेनॉल पुरवठादारांना किंमत स्थिरता आणि किफायतशीर किमती पान २ वर

### पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रीत करण्याचे लक्ष्य

अश्विनी वैष्णव म्हणाले की, केंद्र सरकारने २०३० च्या ऐवजी २०२५–२६ पर्यंत पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रीत करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. तेल कंपन्यांनी २०२४–२५ दरम्यान १८ टक्के मिश्रणाचे लक्ष्य साध्य करण्याची योजना आखली आहे. ते म्हणाले की, गेल्या दहा वर्षांत (३१ डिसेंबर २०२४ पर्यंत), सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांनी (ओएमसी) पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळल्यामुळे १,१३,००७ कोटी रुपयांपेक्षा जास्त परकीय चलनाची बचत झाली आहे. अंदाजे १९३ लाख मेट्रिक टन कच्च्या तेलाच्या ऐवजी इथेनॉल मिश्रित तेलाचा वापर करण्यात आला असल्याचे ते म्हणाले.

### साखर उद्योग मात्र निराश

केंद्र सरकारने इथेनॉलच्या दरात वाढ करावी, अशी मागणी साखर उद्योगाने अनेक महिन्यांपासून लावून धरली होती. त्यानुसार केंद्र सरकारने सी हेवी मोलॅसिसपासून तयार होणाऱ्या इथेनॉलच्या किंमतीत प्रति लिटर १.३९ रुपयांची वाढ केली. मात्र सरकारने उसाचा रस आणि बी हेव्ही मोलॅसिसपासून तयार इथेनॉलच्या दरात वाढ केली नाही. त्यामुळे साखर उद्योगाने नाराजी व्यक्त केली आहे. सरकारने मका आणि धान्यापासून निर्मित इथेनॉलचे भाव जास्त ठेवले होते. त्यामुळे साखर उद्योगाकडून थेट उसाच्या रसापासून, बी हेव्ही मोलॅसीसीपासून आणि सी हेव्ही मोलॅसीसपासून निर्मित इथेनॉलच्या दरात वाढ करण्याची मागणी केली जात होती. सरकारने अनेक महिन्यांपासून ही मागणी टाळली होती.

# मागण्या मान्य करणार नसेल तर वेगळ्या मार्गाने जावे लागेल

## जरांगे पाटील यांचा मुख्यमंत्र्यांना इशारा



जालना । प्रतिनिधी

**आमच्या ज्या सात – आठ मागण्या आहेत, त्या मान्य करायच्या आहेत की नाहीत, त्यांची अंमलबजावणी करायची आहे की नाही याबाबत स्पष्टपणे सांगावे. तुम्ही अंमलबजावणी करणार नसाल तर आम्हाला वेगळ्या मार्गाने आंदोलन करावे लागेल. अशा शब्दांत मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थेट इशारा दिला.**

मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी मनोज जरांगे–पाटील यांच्या उपोषणाचा पाचवा दिवस आहे. जरांगे पाटील यांची प्रकृती खालावल्याने चेहरा पूर्णपणे सुकलेला आहे, अंगात त्राण नाही, त्यांना बोलताना त्रास होत आहे. तरीही जरांगे – पाटील आपल्या मागण्यांवर ठाम आहेत. याच अवस्थेत त्यांनी उपोषण स्थळावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अल्टिमेटम दिला आहे. सरकार आमच्या मागण्या पूर्ण करणार आहे की नाही हे त्यांनी सांगावे. अनेक लोक उपोषणाला बसले आहेत आम्ही ज्या मागण्या केल्यात त्या देणार आहेत की नाही? हे सांगावे, म्हणजे आम्ही आमच्या आंदोलनाची पुढील दिशा ठरवू. बुधवारी ५ दिवस उलटूनही मुख्यमंत्र्यांनी काही निर्णय घेतला नाही. आरक्षण देणार की नाही, हे मुख्यमंत्र्यांनी सांगावे. किंबहुना मी माझ्या मतावर ठाम पान २ वर

# पालकमंत्री पदाच्या काळात धनंजय मुंडेकडून कोट्यावधींचा घोटाळा!

## आ.सुरेश धस यांचा तपशीलासह थेट हल्ला

आष्टी । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळं संशयाच्या भोवऱ्यात सापडलेले मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आमदार सुरेश धस हे वारंवार हल्लाबोल करत आहेत. आता त्यांनी काही कागदपत्रे पत्रकार परिषदेत सादर करत पालकमंत्री असताना मुंडेंनी कोट्यवधींचा घोटाळा केल्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यांनी थेट या पैशांच्या अपहाराचा पाढाच वाचला आहे.**

धस म्हणाले, धनंजय मुंडे सामाजिक न्याय मंत्री आणि बीडचे पालकमंत्री असतानाच्या कार्यकाळात त्यांनी परळी विधानसभा मतदारसंघात एकही काम न करता विविध मार्गे ७३ कोटी ३६ लाख रुपयांची बोगस बिले उचलली आहेत. यासंदर्भातील सर्व कागदपत्रे माझ्याकडे आहेत, याच्या तीन फाईल्स मी तयार केल्या आहेत, असे ते म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बीडच्या दौऱ्यावर येणार आहेत त्यावेळी त्यांच्यासमोर या फाईल ठेवल्या जाणार आहेत. तसेच अजित पवारांसमोरही यासंदर्भातील कागदपत्रे आम्ही ठेवणार आहोत, असे धस यांनी सांगितले.



### एकाच दिवशी उचलले ३७ कोटी ७० लाख

ही खरंतर आर्थिक घोटाळा करण्याची मोडस ऑपरेंडी आहे. यामध्ये कलेक्टरकडून जिल्हा परिषदेला पैसे टाकायचे त्यानंतर जिल्हा परिषदेकडून हे पैसे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ट्रान्सफर करायचे. हे पैसे ३१ मार्च रोजी उचलण्याची गरज नाही, तर हे पैसे २५ जून २०२२ रोजी एकाच दिवशी ३७ कोटी ७० लाख रुपये उचलले आहेत. एकही काम न करता हे पैसे उचलले आहेत, असा सणसणीत आरोपही यावेळी सुरेश धस यांनी केला.

### धसांनी मांडला बिलांचा तपशील

२०२१–२२ या काळात पालकमंत्री धनजंय मुंडे हे बीडचे पालकमंत्री असताना जिल्हा वार्षिक योजना म्हणजे डीपीडीसीद्वारे परळी आणि आंबाजोगाई तालुक्यातील कामे न करता कोट्यावधी रुपयांची बिलं उचलली. ३० डिसेंबर २०२१ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागातून २ कोटी ३१ लाख, १८ मार्च २०२२ रोजी कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग बीड इथून १० कोटी ९८ लाख रुपये, २५ मार्च २०२२ रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग आंबाजोगाई यांच्याकडून ६ कोटी ५९ लाख रुपये, २६ जून २०२२ रोजी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग २ यांच्याकडून १६ कोटी ४८ लाख रुपये तर ३१ मार्च २०२२ रोजी कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग बीड यांच्याकडून १ कोटी ३४ लाख रुपये, असे एकूण ३७ कोटी ७० लाख रुपयांची या कामांची बोगस बिले तत्कालीन प्रभारी कार्यकारी अभियंता संजय मुंडे यांनी उचलून दिली आहेत.

### धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप

१३ डिसेंबर २०२१ रोजी १६ कोटी २० लाख रुपये रस्ते दुरुस्तीच्या नावाखाली काडीचेही काम न करता पैसे उचलले आहेत. पुढे परळी–पूस–बर्दापूर या मार्गावरील रस्ता कामासाठी ५ कोटी रुपये काम न करता बिल उचलले आहे. या एकाच कामावर दोनदा पैसे उचलण्यात आले आहेत. त्यानंतर डीपीडीसीमधून २५ मार्च २०२० रोजी परळीतील ५७ कामांची प्रशासकीय मान्यता रद्द केली तरीही याच्या नावे १४ कोटी ४६ लाख रुपयांची बोगस बिले एकाच दिवशी ३७ कोटी ७० लाख उचलली. अशी मिळून एकूण ७३ कोटी ३६ लाख रुपयांची बोगस बिलं उचलण्यात आली आहेत. महाराष्ट्रात एवढी बोगसं बिलं उचलण्यात आलेली नसतील. हा एवढा मोठा उद्योग पालकमंत्री आणि सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी केला आहे, असे धस म्हणाले.

# महाकुंभात शाही स्नानासाठी उडालेल्या झुंबडीत चेंगराचेंगरी, ३० जणांचा मृत्यू

## मृत्युची संख्या वाढण्याची शक्यता

प्रयागराज । वृत्तसंस्था

दि.२९ जानेवारी २०२५ च्या पहाटे महाकुंभाच्या संगम परिसरात मौनी अमावस्येनिमित्त पवित्र स्नान करण्यासाठी कोट्यवधी यात्रेकरू जागेसाठी धावपळ करत असताना चेंगराचेंगरी झाली आणि त्यात मोठ्या प्रमाणावर जीवितहानी



झाली. सध्या उत्तर प्रदेश सरकारकडून ३० जणांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत असून, ही संख्या आणखी वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

चेंगराचेंगरीत उत्तर प्रदेश सरकारने मृतांच्या संख्येबाबत मौन बाळगले असले तरी, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि अनेक केंद्रीय मंत्री, विविध पक्षांच्या विरोधी नेत्यांनी पीडितांना आणि त्यांच्या कुटुंबियांना शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत. दरम्यान, चेंगराचेंगरीमुळे पुढे ढकलण्यात आलेला पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२८ जानेवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: १.०० क्विंटल | ३,१०० | ३,१०० | ३,१०० |
| ज्वारी/हायब्रिड :२५.०० क्विंटल | २,१७० | २,८४० | २,८४० |
| मका/लोकल:१५.५० क्विंटल | २,१०३ | २,१०३ | २,१०३ |
| तूर : ८४.५० क्विंटल | ६,००० | ७,००१ | ६,७७६ |
| उडीद : १.५० क्विंटल | ६,३०० | ६,३०० | ६,३०० |
| बाजरी: १.५० क्विंटल | २,७५० | २,७९१ | २,७७० |
| मुग : ०.५० क्विंटल | ७,२५० | ७,२५० | ७,२५० |
| सोयाबीन: १२.५० क्विंटल | ३,८२५ | ४,००० | ३,९०६ |
| हरभरा: १७९.५० क्विंटल | ३,९५० | ४,१०१ | ४,०६३ |

# अजित पवार आज तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ५ फेब्रुवारीला बीड जिल्ह्यात

बीड । प्रतिनिधी



**भाजपचे आमदार सुरेश धस यांच्या आष्टी मतदारसंघात विकासकामांच्या उद्घाटनासाठी देवेंद्र फडणवीस हे येत्या ५ फेब्रुवारी रोजी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. तर उपमुख्यमंत्री अजित पवार हे गुरूवार दि.३० रोजी बीड येथे असणार आहेत.**

भाजपा आमदार सुरेश धस यांच्या आष्टी मतदारसंघातील कुंटेफळ तलावाच्या कामाच्या उद्घाटन प्रसंगी देवेंद्र फडणवीस यांची विशेष उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमानंतर देवेंद्र फडणवीस विविध विभागाचा आढावा घेणार आहेत. त्याचबरोबर मच्छिंद्रनाथ संस्थानावर मुख्यमंत्री देवेंद्र पान २ वर

# धान्य वितरणाचे लक्ष्य ७ कोटिंवरून वाढवून ८ कोटी २० लाख करा

## धनंजय मुंडे यांची केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांना विनंती

नवी दिल्ली । वृतसंस्था

महाराष्ट्र राज्याला लाभार्थ्यांचे सुधारित वाटप अधिनियम – २०१३ अंतर्गत तत्कालीन लोकसंख्येच्या आधारावर ७ कोटी १६ हजार इतके लक्ष्य दिलेले होते. मात्र मागील दशकात वाढलेल्या लोकसंख्येनुसार हे लक्ष्य वाढवून ८ कोटी, २० लाख, ६१ हजार इतके करण्यात यावे, याबाबत अन्न व नागरी पुरवठा विभाग महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारला २०२१ साली प्रस्ताव दिलेला आहे, त्यास मान्यता देण्यात



यावी, अशी मागणी आज राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण पान २ वर

# गोविंद पानसरे हत्या प्रकरण: आरोपींना उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर



मुंबई । प्रतिनिधी

कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरणातील आरोपींना मुंबई उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर झाला आहे. सचिन अंदुरे, गणेश मिस्कीन, अमित देगवेकर, भरत कुरणे आणि वासुदेव सूर्यवंशी या पाच आरोपींना २०१८ ते २०१९ दरम्यान अटक करण्यात आली होती. न्यायमूर्ती ए. एस. किल्लोर यांच्या एकलपीठाने हा निर्णय बुधवारी (दि.२९) दिला.

अटक झाल्यापासून आरोपी तुरुंगातच होते. खटला लवकर निकाली लागण्याची शक्यता नाही, त्यामुळे जामीन मंजूर केल्याचे हायकोर्टाने म्हटले आहे. याशिवाय तपासात लक्षणीय प्रगती न झाल्यामुळे आरोपी जामीनासाठी पात्र पान २ वर

# बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसाठी ३०० कोटींचे सॉप्टलोन देण्याची अजित पवाराकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला कृषी व अकृषी कर्ज पुरवठा सुरु ठेवण्यासाठी राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून ३०० कोटी रुपयांचे सॉफ्ट लोन सवलतीच्या दरात देण्यात यावी, अशी मागणी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी केली.**

बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विविध अडचणीच्या संदर्भात उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी मुंबईत झालेल्या बैठकीस दिल्ली येथून ते व्हीसी द्वारे सहभागी झाले. त्याचबरोबर बँकेच्या शाखांमध्ये आधुनिक भौतिक व तांत्रिक सुविधा निर्मितीसाठी १५ कोटी रुपयांची विशेष मदत शासनाने करावी आणि जिल्हा बँकेचे शासनाच्या विविध सवलत योजनेतील बाकी असलेले येणे शासनाने लवकरात लवकर अदा करावे, अशी विनंती केली. या सर्वच विषयी अर्थ व नियोजन विभाग, राज्य सहकारी बँक, नाबार्ड यांच्याशी चर्चा करून सकारात्मक निर्णय घेतला जाईल, तसेच सहकार विभागामार्फत बँकेसाठी एक तज्ज्ञ अधिकारी दिला जाईल, असे आश्वासन दादांनी दिले. या बैठकीस बीडचे पालकमंत्री अजित पवार, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांसह अर्थ व नियोजन विभाग, राज्य सहकारी बँक तसेच नाबार्डचे पान २ वर



अग्रलेख

# आश्वसानांची खैरात; कोन असणार दिल्लीपती?

सध्या दिल्लीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. 'आप'सह सारेच राष्ट्रीय पक्ष जोरदार तयारीला लागले आहेत. 'आप' आणि काँग्रेस स्वबळावर निवडणूक लढवत आहेत. आप, काँग्रेस आणि भाजप अशी तिरंगी लढत आहे. दिल्लीच्या ७० जागांसाठी एकाच टप्प्यामध्ये मतदान होणार आहे. मतदान ५ फेब्रुवारी रोजी होणार असून ८ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होईल. लोकसभा निवडणुकीत राजस्थानच्या फलोदी सट्टा बाजाराने काही अंदाज वर्तवले होते. आता त्यांनी दिल्ली विधानसभेसाठीही काही अंदाज वर्तवले आहेत. त्यांची भविष्यवाणी खरी ठरल्यास यंदा दिल्लीमध्ये चित्र संपूर्णपणे बदललेले दिसू शकेल. 'फलोदी'च्या अंदाजानुसार दिल्लीतील आम आदमी पक्षाचे सरकार काहीसे अडचणीत येण्याची शक्यता आहे. त्यांना सरकार स्थापन करण्यासाठी काँग्रेसची मदत घ्यावी लागेल तर भाजप हा एक मजबूत विरोधी पक्ष म्हणून उदयास येऊ शकेल. थोडासा उलटफेर झाल्यास भाजपची सत्ताही येऊ शकेल.

फलोदी सट्टा बाजार अचूक अंदाजासाठी प्रसिद्ध आहे. हे केवळ अंदाज असतात. ते खरे ठरतात की नाही हे निवडणुकीचा निकाल लागल्यावरच स्पष्ट होईल. 'फलोदी'च्या अंदाजानुसार आम आदमी पक्षाला नुकसान होण्याची शक्यता आहे तर भाजप आपली पकड मजबूत करताना दिसेल. भाजपला २५-३० जागा मिळण्याची शक्यता आहे. मात्र, ते बहुमताचा आकडा पार करण्याची शक्यता कमी आहे. अरविंद केजरीवाल यांनी १५ हमीपत्रांची घोषणा केली आहे. त्यात सलग तिसऱ्यांदा यमुना साफसफाईचे आश्वासन देण्यात आले आहे. महिलांसाठी रोजगार, यमुनेची साफसफाई, २४ तास पाण्याची सोय, महिलांसाठी सन्मान योजना अशा घोषणा आहेत. दुसरीकडे अमित शहा यांनी केजरीवाल यांच्यावर टीकेचा भडिमार केला आहे.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत प्रत्येक राजकीय पक्ष मतदारांना दररोज नवनवीन आश्वासने देत आहे. काँग्रेसने बौद्ध स्थळ पर्यटनाची मोफत यात्रा घडवून आणण्याचे आश्वासन दिले आहे. दिल्लीत हिंदू धर्मियांसाठी सरकारकडून मोफत यात्रा आयोजित केल्या जातात. दिल्ली सरकार तिरुपती, अयोध्या, वैष्णोदेवी या धार्मिक ठिकाणी भाविकांना मोफत धार्मिक पर्यटन घडवून आणत असते, पण बौद्ध धर्मियांसाठी अशी कोणतीही योजना नाही. काँग्रेस सरकार आले तर सारनाथ, बौद्धगया, लुम्बिनी, दीक्षाभूमी या बौद्ध स्थळांसाठी पर्यटन यात्रा घडविण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. केजरीवालांनी गुरुद्वारामधील पुजाऱ्यांना दरमहा १८ हजार रुपये देण्याची घोषणा केली. परंतु बौद्ध भिक्खू, रविदास व वाल्मिकी मंदिरातील पुजा-यांना यातून वगळण्यात आले. केजरीवालांनी महिला सन्मान योजनेंतर्गत दरमहा २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले आहे. एकंदरीत दिल्ली निवडणुकीसाठी सा-याच पक्षांनी रेवडी वाटप केले आहे. दिल्लीच्या नागरिकांपुढे दोन मॉडेल आहेत. पहिले आहे केजरीवाल मॉडेल. ज्यात जनतेवर पैसे खर्च केले जातात. दुसरे आहे भाजपचे मॉडेल. ज्यात जनतेचा पैसा त्यांच्या श्रीमंत मित्रांच्या खिशात जातो. आता कोणते मॉडेल निवडायचे ते जनतेने ठरवायचे आहे. ही निवडणूक केवळ दिल्लीला नाही तर देशाला वाचवण्याची निवडणूक आहे. ही भाजप आणि आम आदमी पक्षातील निवडणूक नाही तर दोन विचारसरणींमधील निवडणूक आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीत आश्वासनांच्या स्वरूपात पैशांचा पाऊस पाडत आहे. मोफत रोख रकमेचे राजकारण नियंत्रणाबाहेर गेले आहे. कोणाच्या आश्वासनांवर विश्वास ठेवावा आणि कोणाच्या नाही अशी मतदारांची दोलायमान स्थिती झाली आहे. मतदार जाणून आहेत की, आपल्या मूलभूत समस्यांवर कोणत्याही राजकीय पक्षाकडे उपाय नाही. म्हणूनच त्याला पैशाचे आमिष दाखवले जात आहे.

राजकीय पक्ष सार्वजनिक विकासापेक्षा खासगी फायद्याला प्राधान्य देणाऱ्या निवडणूक मॉडेलकडे वाटचाल करीत आहेत. अर्थात याचे गंभीर परिणाम होणे अटळ आहे. सध्या फक्त निवडणुकीचे राजकारण हेच अंतिम ध्येय बनले आहे. आपले काम झाले ना, मग जनता नरकात गेली तरी चालेल अशी राजकारण्यांची मानसिकता बनली आहे. निवडणुका जिंकण्यासाठी सर्व युक्त्या वापरल्या जातात, त्यासाठी मतदारांना आंजारले-गोंजारले जाते. एकदा का सत्ता मिळाली की, 'देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे' हे गीत गुणगुणत देणाऱ्याचे हातच घेतले जातात. मतदारांसाठी निवडणुका मृगजळासमान आहेत. ये भी लुच्चा, वो भी लुच्चा!

# बुरखा घालून परीक्षा केंद्रात प्रवेश नको

## मंत्री नितेश राणे यांचे शिक्षणमंत्री दादा भुसेंना पत्र

मुंबई । प्रतिनिधी

**मुस्लिम परीक्षार्थी विद्यार्थिनींना बुरखा घालून परीक्षा केंद्रात प्रवेश देऊ नका, अशी मागणी करणारे पत्र मस्त्य व्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणेंनी शिक्षणमंत्री दादा भुसेंना लिहिले आहे. आगामी दहावी-बारावीच्या परीक्षांच्या धर्तीवर हे पत्र लिहिण्यात आले आहे. बुरख्यामुळे कॉपीचे प्रमाण वाढण्याची भीती मंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केली आहे. यामुळे नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे**

नितेश राणे म्हणाले, देशामध्ये राहताना इतर धर्मीय विद्यार्थ्यांना जो नियम लागतो तो नियम मुस्लिम विद्यार्थ्यांनी देखील पाळला पाहिजे. बुरखा घालून परीक्षेला बसाल तर त्याचे अनेक धोके आहेत. संबंधित खात्याने या संदर्भात लवकर निर्णय घ्यावा. राज्यात हिंदुत्ववादी विचाराचे सरकार आहे. आता लाड करण्याची गरज नाही. नितेश राणे पुढे म्हणाले, हा निर्णय २०२४ सालचा आहे. परीक्षेसोबतच मतदानाच्या वेळीही असे प्रकार उघडकीस आलेले आहेत. नेमकी तेच विद्यार्थिनी परीक्षेला आहेत का हे देखील पाहावे लागेल. इतर विद्यार्थ्यांप्रमाणे या मुलांनीही आपला धर्म शाळेत आणू नये. इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेस परीक्षार्थींना बुरखा घालून परीक्षा देण्यास परवानगी, तसेच परीक्षेच्या वेळी आवश्यकता वाटल्यास प्रकरण परत्वे तपासणीसाठी महिला पोलिस/अधिकारी किंवा शिक्षक कर्मचारी, यांची नेमणूक करण्यात यावी, असे शासन स्तरावरून कळविण्यात आले आहे. इयत्ता दहावी व बारावी परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. शासनस्तरावरून वेळोवेळी सूचना दिल्या जातात. जर, परीक्षार्थींना बुरखा घालून परीक्षा केंद्रावर प्रवेश देण्यात आला तर, एखादी परीक्षार्थी बुरखा घालून इलेक्ट्रॉनिक उपकरणाचा उपयोग करून परीक्षा देत आहे की नाही, हे तपासणे शक्य होत नाही. आकस्मिक प्रसंगी काही आक्षेप उद्भवल्यास सामाजिक तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन अनेक विद्यार्थ्यांना नुकसान सहन करावे लागेल.

# चेअरमन कुटे याच्यासह चौघांना एक फेब्रुवारी पर्यंत पोलीस कोठडी



अंबड । प्रतिनिधी

ज्ञानराधा मल्टीस्टेटचा चेअरमन सुरेश कुटे याच्यासह ४ जणांना अंबड पोलिसांनी दि.२८ जानेवारी रोजी न्यायालयात हजर केले असता ५ दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की, अंबड पोलीस ठाण्यात दाखल गु.र.न. २८४/२४ कलम ४२०, ४०९,१२० (ब) भा. द. वि. सह कलम ३, ४, ५ एमपीआयडी कायदामधील आरोपी सुरेश ज्ञानोबा कुटे (वय ५० वर्ष), आशिष पद्माकर पाटोदेकर (वय ३० वर्ष), यशवंत वसंत कुलकर्णी (वय ५५ वर्ष) आणि वैभव यशवंत कुलकर्णी (वय २१ वर्ष) याना जालना आर्थिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक सुरवसे व अंबड पोलिसांनी अंबड सत्र न्यायालयात हजर केले असता दि. १ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. चेअरमन सुरेश कुटे यास आज बीडहून अंबड न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याची माहिती शहरात आधीच सर्वत्र पोहचल्याने ठेवीदारांसह नागरिकांनीही मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. यावेळी पोलिसांनी आरोपीना चोख बंदोबस्तात न्यायालयात हजर करून पुन्हा जालनाकडे पाठवले.

# धनंजय मुंडे पुढे नवे संकट; ईडी चौकशीसाठी उच्च न्यायालयात याचिका!

मुंबई । प्रतिनिधी

**संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून वाल्मीक कराड व धनंजय मुंडे यांच्या हितसंबंधावरून राजीनाम्याची मागणी जोर धरत असतानाच उच्च न्यायालयात आणखी एक याचिका धनंजय मुंडे विरोधात दाखल करण्यात आली आहे. मंत्री धनंजय मुंडे यांचे पाय आणखी खोलात गेले असून मुंडे यांच्या मालकीच्या अनेक शेल कंपन्या आहेत. खंडणीची रक्कम त्यांनी वळती केल्याचा गंभीर आरोप करीत या प्रकरणाचा थेट तपास उच्च न्यायाल्याच्या देखरेखेखाली करावा. त्यासोबतच याचा तपास समांतर ईडीने देखील करावा, यासाठी या प्रकरणी थेट हायकोर्टात याचिका दाखल केली आहे.**

शेल कंपन्यात गुंतवणूक करण्यात आलेली रक्कम कुठून आली, याचा तपास करण्यात यावा, या प्रकरणी मनी लाँडरिंग झाला असल्याचा आरोप याचिकेमध्ये करण्यात आला आहे. परळी येथील व्यंकटेश्वरा सेल्स इंडस्ट्रियल प्रा. लि. मध्ये धनंजय मुंडे, त्यांच्या पत्नी राजश्री मुंडे व वाल्मिक कराड व अन्य काही व्यक्ती संचालक आहेत. एसआयटीकडून या प्रकरणाचा तपास केला जात आहे. या प्रकरणाचा तपास थेट उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली व्हावा आणि सक्तवसुली संचालनालयानेही समांतर तपास करावा, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली आहे. योग्य तपास झाल्यास मंत्र्यावर मकोका अंतर्गत कारवाई होऊ शकते, असेही याचिकेत म्हटले आहे. या प्रकरणी आरटीआय कार्यकर्ते केतन तिरोडकर यांनी ही याचिका दाखल केली असून, त्यावर सुनावणी होण्याची शक्यता आहे. या याचिकेत बीडच्या पोलीस अधीक्षकांना तपास अहवाल सादर करण्याचे निर्देश द्यावेत, तसेच निवडणूक आयोगाला ही याचिका आणि धनंजय मुंडे यांनी निवडणूक आयोगापुढे दाखल केलेले प्रतिज्ञापत्र पडताळून कारवाई करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी केली आहे. त्यामुळे या याचिकेवरील सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.व्यंकटेश्वर इंडस्ट्रियलच्या कार्यालयात वाल्मीक कराडचे बेकायदा धंदे सुरू असतात.



तेथूनच त्याने आवादा या पवनऊर्जा निर्मिती करणाऱ्या कंपनीकडून दोन कोटी रुपयांची लाच मागितली. या कंपनीचे संचालक धनंजय मुंडें आहेत. जगमित्र साखर कारखान्याचेही संचालक वाल्मीक कराड, धनंजय मुंडे व अन्य काही जण असून, या कारखान्याच्या कार्यालयाची जागा धनंजय मुंडे यांच्या नावावर खरेदी करण्यात आल्याची माहिती देखील समोर आली आहे. याबरोबरच दुसरीकडे उच्च न्यायालयात काही दिवसापूर्वीच धनंजय मुंडे यांच्या विरोधात याचिका दाखल करण्यात आली आहे. धनंजय मुंडे यांनी भ्रष्ट मार्गाचा अवलंब करुन निवडणूक जिंकल्याचा आरोप करुणा शर्मा यांनी केला आहे. करुणा शर्मांचा दावा आहे की, त्यांचे धनंजय यांच्यासोबत कायदेशीर लग्न झालेले आहे. त्यांनी याचिका दाखल करुन गंभीर आरोप मंत्री मुंडेंवर केले आहेत. करुणा शर्मा यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीसाठी परळी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरला होता. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांचा अर्ज ३० ऑक्टोबर २०२४ रोजी फेटाळला होता. मात्र, धनंजय मुंडे आणि इतरांचे अर्ज मंजूर केले होते. परळी विधानसभा मतदारसंघातून धनंजय मुंडे निवडून आल्याचे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी २३ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या मतमोजणीनंतर घोषित केले होते.त्यानंतर करुणा शर्मा यांनी ४ जानेवारी २०२४ रोजी खंडपीठात निवडणूक याचिका सादर केली आहे. आपण स्वतः १९९६ मध्ये धनंजय मुंडे यांच्याशी कायदेशीर लग्न केले होते. अधिकृत पत्नी असताना धनंजय मुंडे यांनी दोन अपत्यांचा उल्लेख केला. मात्र, पहिल्या पत्नीच्या नावावरील मालमत्ता आणि कोर्टातील प्रलंबित प्रकरणांची माहिती दडवली, असल्याचे त्यांनी या याचिकेत म्हटले आहे.धनंजय मुंडे यांच्या विरोधातील पुरावे सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानियानी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सादर करीत मुंडे यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी केली आहे तर दुसरीकडे भाजप आमदार सुरेश धस आणि आमदार संदीप क्षीरसागर यांच्याकडून धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्याची मागणी सातत्याने लावून धरली जात आहे. मुंडे यांच्या राजीनाम्यासाठी विरोधकांकडून राज्य सरकारवरील दबाव वाढवला जात आहे. संपूर्ण राज्यभर मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाचा मोर्चे काढून निषेध केला जात आहे. या प्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा करण्याची मागणी केली जात आहे. तर दुसरीकडे मंत्री धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यासाठी विरोधक एकवटले आहेत. त्यामुळे धनंजय मुंडे यांच्या अडचणी दिवसेंदिवस वाढत असल्याचे पाहायला मिळत आहे.

# नांदेडच्या तरुणाचा परळीत जीवन संपविण्याचा प्रयत्न, स्वत:च्याच गळ्यावर ब्लेडने केले वार

परळी । प्रतिनिधी

**पुण्याहून नांदेडकडे जात असलेल्या तरुणाने परळी रेल्वे स्थानकावर उतरून परळीच्या बस स्थानकाजवळ आत्महत्येच प्रयत्न केला. दत्ता दीपक गोंडेकर ( वय २४ वर्ष राहणार नांदेड ) असे सदरील युवकाचे नाव आहे. बुधवार दिनांक २९ जानेवारी रोजी दुपारच्या वेळी स्वत:च्या गळ्यावर ब्लेडने वार केले त्यामुळे दत्ता गोंडेकर हा रक्तबंबाळ झाला होता अशा अवस्थेत त्यास परळीच्या शहर पोलीस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक व्यंकट भताने यांनी तातडीने परळीच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.**



परळीच्या उपजिल्हारुग्णालयात प्राथमिक उपचार करून दुपारी पाचच्या सुमारास अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तेथे उपचार चालू आहेत. या संदर्भात दत्ता गोंडेकर यांच्या नातेवाईकांना पोलिसांनी माहिती कळविली आहे. दत्ता दीपक गोंडेकर हा पुण्याहून परळीला रेल्वेने आला होता. तो आपल्या गावी नांदेडला जाणार होता. परंतु परळीच्या बसस्थानक जवळ गळ्यावर ब्लेडने वार करून जखमी करून घेतले असल्याची माहिती पोलीस सूत्रांकडून प्राप्त झाली आहे. नेमका हा काय प्रकार आहे ?कशामुळे त्याने हा प्रकार केला? याची माहिती प्राप्त होऊ शकली नाही. पोलिसांचा तपास सुरू असून या प्रकरणी अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही.

# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी मागितल्यास राजीनामा देणार-धनंजय मुंडे

## थेट दिल्लीत साधला पत्रकारांशी संवाद

दिल्ली । वृतसंस्था

**मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना जर मी कुठे दोषी वाटत असेल तर त्यांनी राजीनामा मागावा, मी राजीनामा देणार. मी दोषी आहे का? हे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री सांगू शकतील. असे मुंडे यांनी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना सांगितले.**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील संशयित आरोपी वाल्मीक कराड आणि मंत्री धनंजय मुंडे यांचे जवळचे संबंध असल्याचा आरोप करत मुंडे यांच्या राजीनाम्याच्या मागणीने जोर धरला आहे. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही नुकतीच उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेत धनंजय मुंडे यांच्याबाबतची काही कागदपत्रे त्यांना दिली होती. या पार्श्वभूमीवर अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सरपंच संतोष देशमुख



यांची निर्घृण हत्या झाली. या प्रकरणी जे कोणी दोषी आहेत त्यांना त्यांना फासावर चढवा, अशी आपली मागणी असल्याचेही मुंडे म्हणाले. धनंजय मुंडे यांनी बुधवारी केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांची भेट घेतली. या भेटीत केवळ अन्न नागरी पुरवठ्याशी संबंधित समस्येवर चर्चा झाल्याचे मुंडे यांनी स्पष्ट केले. केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांची नवी दिल्ली येथे त्यांच्या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. यावेळी खात्यातील विविध अडचणींबाबत केंद्राच्या आवश्यक मदतीच्या दृष्टीने सकारात्मक चर्चा झाली. तसेच विभागाचे कामकाज अधिक प्रभावीपणे करण्याबाबत जोशी यांचे मार्गदर्शन मिळाल्याचे मुंडे यांनी सांगितले.

### “ मुंडेंच्या राजीनाम्यासाठी ९६ तासांचा अल्टिमेटम

वाल्मीक कराड आणि धनंजय मुंडे कसे एकत्र आहेत. त्यांचे व्यवहार कसे एकत्र आहेत, याचे पुरावे घेऊन धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी अजित पवारांना भेटल्याचे दमानिया यांनी नुकतेच म्हटले होते. धनंजय मुंडे यांचा चार दिवसांत राजीनामा घेतला नाही तर न्यायालयात जाणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. त्यासाठी ९६ तासांचा अल्टिमेटम दिला आहे.

## पान १ वरून...

### इथेनॉल दरवाढीला केंद्रीय

प्रदान करण्याचे धोरण सुरू ठेवण्यास सरकारला मदत होईल, असे वैष्णव म्हणाले. शिवाय कच्च्या तेलाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यास, परकीय चलन वाचवण्यास आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यास देखील मदत होईल, असे ते म्हणाले.

-----------

### मागण्या मान्य करणार नसेल

आहे. त्यामुळे आमच्या मागण्यांबाबत मुख्यमंत्र्यांनी दोन शब्दांत आपली भूमिका सांगायला हवी, असे जरांगे म्हणाले.

**मुख्यमंत्र्यांनी हो किंवा नाही असे सांगावे**

आमच्या आठ ते नऊ मागण्या आहेत. त्या पूर्ण करायच्या आहेत की नाहीत. हो किंवा नाही हे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले पाहिजे. कारण अनेक लोक उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या जीवाचा प्रश्न आहे. आमच्या मागण्या मान्य करायच्या नसतील तर आम्हाला वेगळ्या मार्गाने आंदोलन करावे लागेल, असा इशारा यावेळी जरांगेंनी दिला. मुख्यमंत्र्यांनी एक तर हो किंवा नाही म्हणून सांगावे, म्हणजे आम्हाला पुढील दिशा ठरवता येईल, असे जरांगे म्हणाले. दरम्यान, उपोषणस्थळावरून जरांगेंनी आपली भूमिका मांडल्यानंतर उपस्थित समर्थकांनी जोरदार घोषणाबाजी केली.

-----------

### धान्य वितरणाचे लक्ष्य ७ कोटिंवरून

मंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी यांची दिल्ली येथे भेट घेऊन केली आहे. अन्न धान्य वितरण प्रणाली सुरळित करून त्यामधील लहान मोठ्या अडचणी दूर करण्यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घ्यावा, याबाबत राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी आज नवी दिल्ली येथे केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी यांची भेट घेऊन विनंती केली. महाराष्ट्रात वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात अधिनियम २०१३ नुसार मागील एक दशकात वाढलेल्या लोकसंख्येनुसार लाभार्थी लक्ष्यांक निश्चित करण्यात यावा. ऑनलाईन वितरण प्रणाली मध्ये भासणाऱ्या लहान मोठ्या समस्या दूर कराव्यात, मशीन संदर्भातील तांत्रिक अडचणी दूर करणे, आदी समस्यांबाबत धनंजय मुंडे यांनी श्री जोशी यांना माहिती दिली. आरसीएमएस अर्थात शिधा पत्रिका व्यवस्थापन प्रणाली संपूर्णत: सुरळीत चालू ठेवण्याबाबत संबंधितांना केंद्र शासन स्तरावरून निर्देश व्हावेत, अशीही विनंती धनंजय मुंडे यांनी या भेटीत केली. फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया अंतर्गत प्रलंबित परतावे, सीएमआर खरेदी बाबत थकबाकी, जिल्हा पुरवठा अधिकारी यांना विचारात घेऊनच वितरण आदेश बदलणे, रेल्वे रेक दरम्यान अन्नधान्य उचलण्यास दुपारी तीन नंतर परवानगी देत नाही, त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन कार्यवाही करणे, इत्यादी विषयी या बैठकीत चर्चा झाली. दरम्यान या सर्वच यंत्रणा व राज्य सरकार यांमध्ये लवकरच एक बैठक आयोजित करून याबाबत सकारात्मक निर्णय घेऊन राज्य सरकारला सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी दिली, यावेळी धनंजय मुंडे यांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

-------

### अजित पवार आज तर मुख्यमंत्री देवेंद्र

फडणवीस यांच्या हस्ते विविध विकास कामांचा भूमिपूजन सोहळा होणार आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या बीड दौऱ्यात पंकजा मुंडे देखील असणार सोबत असणार आहे. अजित पवार आणि पंकजा मुंडे गुरूवारी एकाच विमानाने संभाजीनगरला पोहचणार आहेत. तसेच बीडच्या डीपीडीसी बैठकीत अजित पवारांसह पंकजा मुंडे देखील उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे बीडच्या डीपीडीसी बैठकीत मंत्री धनंजय मुंडे देखील उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

-------------

### महाकुंभात शाही स्थानासाठी उडालेल्या

आखाड्यांचा पारंपारिक स्नान विधी 'अमृत स्नान' दुपारी २.३० वाजता पुन्हा सुरू झाले. नेहमीपेक्षा कमी भव्य मिरवणूकीचे नेतृत्व अखिल भारतीय आखाडा परिषदेचे प्रमुख महंत रवींद्र पुरी यांनी केले. २९ जानेवारी रोजी सकाळपासून प्रयागराजमधील मोबाईल नेटवर्क बंद असल्याने त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना त्यांचा शोध घेता आला नाही. नंतर, त्यांच्यासोबत आलेल्या बेळगावी येथील आणखी एका रहिवाशाने फोन करून त्यांना मृत घोषित केले.

**व्हिआयपी कल्चरमुळे घटना – मल्लिकार्जून खर्गे**

महाकुंभात अर्धवट व्यवस्था, व्हीआयपी कल्चर आणि व्हीआयपींनी स्वतःहून केलेले प्रचार यामुळे चेंगराचेंगरी झाली आणि त्यामुळे अनेकांचे जीव गेले, असा आरोप काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी केला. तसेच भाविकांच्या सुरक्षिततेसाठी सभास्थळी व्हीआयपी कल्चरवर बंदी घालण्याची मागणीही मल्लिकार्जुन खर्गे यांनी केली. मल्लिकार्जून खर्गे त्यांच्या एक्सवरील अकाऊंटवर म्हणाले की, महाकुंभ मेळ्यादरम्यान तीर्थराज संगमच्या काठावर झालेल्या चेंगराचेंगरीत अनेक लोकांचे प्राण गेले आणि अनेक जण जखमी झाले, ही बातमी हृदयद्रावक आहे. भाविकांच्या कुटुंबियांबद्दल आमची तीव्र सहानुभूती आहे आणि जखमींच्या लवकर बरे व्हावे यासाठी आम्ही प्रार्थना करतो.

----------

### गोविंद पानसरे हत्या प्रकरण: आरोपींना

असल्याचा निर्वाळाही कोर्टाने दिला. न्यायमूर्ती ए. एस. किलोर यांनी याच प्रकरणातील आणखी एक आरोपी विरेंद्रसिंह तावडे याच्या जामीन अर्जाचा स्वतंत्रपणे आढावा घेण्याचे निर्देश दिले आहेत.

------------

### बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी

अधिकारी, बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक तसेच जिल्हा बँकेचे प्रशासकीय मंडळ आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी प्रशासक मंडळाच्या कामाचे कौतुकही केले. बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून शेतकरी वर्गाला दिलासा देण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल मुंडे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले.

-------------

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. ३० जानेवारी २०२५




## भैरवनाथ विद्यालय अरणविहिरा येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील अरहणविहरा येथील भैरवनाथ विद्यालय येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा झाला यावेळी गावातून प्रभात फेरी काढण्यात आली, यानंतर विद्यालयात ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाचे अधयक्षस्थानी मुख्याध्यापक श्री शिवदास शेकडे सर व प्रमुख अतिथी म्हणून राजेंद्र रामगुडे यांची निवड करण्यात आली. यानंतर विद्यालयात विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग नोंदविला व लेझीम पथकाने उपस्थित मान्यवर , ग्रामस्थ यांचे मन जिंकले यावेळी ग्रामस्थ, विद्यालयातील सर्व शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजगुरू सर ,सूत्रसंचालन कृष्णा सर यांनी केले आभार प्रदर्शन - के बी सर यांनी केले.

# शोषीत घटकांना न्याय देण्यासाठी पत्रकारिता करावी-आ.डॉ.बाबासाहेब देशमुख

माजलगाव । प्रतिनिधी

पत्रकारीता हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे. बीड जिल्ह्यात तर पत्रकारिता अधिक जागृत आहेत. पत्रकारितीमुळे समाजातील उपेक्षित लोकांवरील अन्यायाला वाचा फोडण्याचे काम केले जाते,असे प्रतिपादन अध्यक्षीय समारोप प्रसंगी खा.बजरंग सोनवणे यांनी केले.तर पत्रकारांनी समाजातील वंचीत, शोषीत घटकांना न्याय देण्यासाठी पत्रकारिता करावी असे आवाहन सांगोला विधानसभेचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी केले.

माजलगाव येथे दि २७ जानेवारी सोमवार रोजी शहरातील वैष्णवी मंगल कार्यालयात आयोजित एकता पत्रकार संघाच्या मुकनायक व माजलगाव भुषण पुरस्कार वितरण सोहळा दि.२७ जानेवारी सोमवार रोजी आयोजीत केला होता.यावेळी मुकनायक पुरस्काराने दै राज्य लोकतंत्रचे बीड/पुणे येथील संपादक गणेश मोकाशे व सा.घोंगडीचे संपादक बंडु खांडेकर यांचा खा.बजरंग सोनवणे व आमदार डॉ बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.यावेळी व्यासपिठावर बाबुराव पोटभरे, मोहन जगताप, भाई मोहन गुंड, विरेंद्र सोळंके, दयानंद स्वामी, कल्याण आबुज, डॉ.श्रीराम खळगे, युवराज लगड, सुरेश भोरे,भाई नारायण गोले पाटील,कचरू खळगे,विश्वांभर थावरे,संतोष यादव, सतिष सोळुंके यांची उपस्थिती होती.यावेळी उद्घाटक म्हणून सांगोला विधानसभेचे आमदार भाई डॉ.बाबासाहेब देशमुख बोलताना म्हणाले की,पत्रकारांनी समाजातील गोरगरीब कष्टकरी, शेतकरी,कामगार अशा वंचीत,शोषीत घटकांना न्याय देण्यासाठी भविष्यात पत्रकारिता करावी तर अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले,पत्रकारीता हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे.बीड जिल्ह्यातील पत्रकार अधिक जागृत असून गोरगरीबांच्या पाठीशी येथील पत्रकार उभा राहतात.गोर-गरीब पिचलेल्या आणि उपेक्षित लोकांना न्याय देण्यासाठी येथील पत्रकार कायम लिहत आलेले असून जिल्ह्यात कोणी चुकीचे वागत असेल तर चुकीला चुक म्हणण्याची हिंमतही पत्रकार दाखवितात. पत्रकारांच्या लेखनीमुळे सामान्य माणसांचा आवाज शासन व्यवस्थेपर्यंत पोहचत आलेला आहे.यापुढे देखील पत्रकारांनी सकारात्मक पध्दतीने पत्रकारीता करून समाजाला जागृत करण्याचे काम करावे,येथील पत्रकार निर्भीडता कायम ठेवतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.यावेळी या कार्यक्रमाचे आयोजकांचे कौतुक करत अनेक क्षेत्रातील उत्कृष्ट काम करण्याऱ्या लोकांचा सन्मान आपण करत आहेत,ही अभिमानाची गोष्ट आहे.आजच्या तारखेमध्ये मंत्रीमोहदय यांच्या भेटीची वेळ असताना आपण या कार्यक्रमाला येणं महत्त्वाचं मानले,असा उल्लेखही त्यांनी यावेळी केला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अशोक वाडेकर यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार वाजेद पठाण यांनी केले तर आभारप्रदर्शन माजलगाव एकता पत्रकार संघाचे अध्यक्ष ज्योतीराम पांढरपोटे यांनी मानले,हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघाचे वसंत परसे,बबलु माने,राजेभाऊ पाष्टे, नय्युम आतार,अनिस अन्सारी यांनी परीश्रम घेतले. माजलगाव भुषण पुरस्काराने यांचा झाला सन्मान माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने मुकनायक दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तालेब चाऊस (सामाजिक कार्य), सुनिल रुद्रावार (सहकार), अंबादास रोकडे (उद्योग), डॉ.दिनकर मस्के (आरोग्य),ऑड.टि.एन.कोल्हे (विधीज्ञ), बाळासाहेब कदम (भुमी पुत्र),सरपंच आजय शिंदे (आदर्श सरपंच ), तलाठी रामेश्वर थापडे (उत्कृष्ट तलाठी), हानुमत राऊत (उत्कृष्ट ग्रामपंचायत अधिकारी) यांचा मान्यवरांच्या हस्ते माजलगाव भुषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



# मराठी पत्रकार परिषदेच्या पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित रहा

**बीड । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषद मुंबई, व परभणी जिल्हा मराठी पत्रकार संघ व सेलू तालुका मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आदर्श जिल्हा व तालुका पुरस्कार वितरण तसेच पत्रकार मेळावा दि. १ फेब्रुवारी रोजी परभणी जिल्हयातील सेलू येथे आयोजित केला आहे. या मेळाव्यास बीड जिल्हयातील तालुका पदाधिकाऱ्यांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरात, ता.निमंत्रक मंगेश निटुरकर, ता. समन्वयक लक्ष्मण नरनाळे यांनी केले आहे.

हा पुरस्कार कार्यक्रम साई नाट्यगृह सेलु येथे दि.१ फेब्रुवारी २०२५ रोजी भव्य आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख हे राहणार असून या कार्यकमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून परभणी जिल्हयाच्या पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर व सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर,कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, उपाध्यक्ष गोपी लांडगे, गणेश मोकाशे,हेमंत वनजू, अविनाश भांडेकर,चंद्रकांत बरदे, विभागीय सचिव दिपक कैतके, पी.पी.कुलकर्णी, रवी उबाळे, प्रदिप घुमटवार,शिखरचंद बागरेचा, मनोज खांबे, सचिन शिवशेट्टे, अमोल खरे, चंद्रकांत क्षीरसागर, राज्य प्रसिध्दी प्रमुख संदीप कुलकर्णी, सहायक राज्य प्रसिध्दी प्रमुख भरत निगडे, राज्य महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, डीजीटल मिडिया परिषदेचे राज्यप्रमुख अनिल वाघमारे, डीजीटल मिडिया परिषद कार्याध्यक्ष सनी शिंदे, डीजीटल मिडिया प्रमुख परिषद उपाध्यक्ष अनिल उंबरकर आर्दीची प्रमूख उपस्थिती राहणार आहे.या मेळाव्यास बीड जिल्हयातील पत्रकार बांधवांनी सेलू येथे सकाळी ९.३० वाजता उपस्थित राहून परिषदेने आयोजित केलेल्या एकता रॅलीस सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरात, ता.निमंत्रक मंगेश निटुरकर, ता. समन्वयक लक्ष्मण नरनाळे यांनी केले आहे.







जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत, ता.निमंत्रक मंगेश निटुरकर, ता. समन्वयक लक्ष्मण नरनाळे

# विद्यावेतन ३१ जानेवारीपर्यंत देण्यात यावे नसता तीव्र आंदोलन

**माजलगाव । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत प्रशिक्षणार्थी सहा महिन्याकरिता प्रशिक्षण घेत आहेत. बहुतांशी जिल्ह्यातील प्रत्येक प्रशिक्षणार्थी हा प्रशिक्षक (ट्रेनी टीचर ) म्हणून तन मनाने विद्यादानाचे काम करत आहे. आज या कार्य प्रशिक्षण प्रणालीला पाचवा महिना लागला आहे. आपला कार्यकाळ सहा महिन्याचा असल्याने ते प्रशिक्षणार्थी हवालदिलं झाले आहेत. प्रशिक्षणार्थ्यांनी पाच महिन्याच्या प्रशिक्षण काळात जे विद्यादानाचे काम केले आहे त्याचा मोबदला पण त्यांना आजतागायत देण्यात आला नाही तालुकास्तरावरील संबंधित अधिकाऱ्याची मानधनाबाबत विचारणा केली असता त्यांच्याकडून जिल्हा कौशल्य विभागातील कर्मचाऱ्याकडून आपल्या ऑनलाईन मध्ये डिफॉल्ट असल्याचे सांगण्यात येत आहे .प्रत्येक वेळी आपली ऑनलाइन प्रणाली चुकीची असल्याचे निदर्शनास आणून देण्यात येत आहे. असे बोलले जात आहे कित्येकदा जिल्हा कौशल्य विभागाकडून ऑनलाईन झालेले फाईल त्या डिलीट करण्यात येत आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री युवा प्रशिक्षक (ट्रेनी टीचर) यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. तरी संबंधित विभागास योग्य त्या सूचना करून मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी यांचे विद्यावेतन देऊन तात्काळ निर्णय घ्यावा नसता दिनांक ३१ जानेवारी रोजी संबंधित कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी यांच्या मार्फत देण्यात आला या निवेदनावर शरद पवार, दिगंबर बादाडे, अविनाश क्षिरसागर, छाया शिंगाडे, पूजा शिंदे , अश्विनी फुंदे , विशाखा वक्ते , सम्रता पोटभरे , परमेश्वर नरसाळे, अमोल चव्हाण , श्रुती कदम, गोविंद आव्हाड, विजय पवार, अजय डाके, शेख आयशा, लक्ष्मण पवार , अंगद गरड, महादेव गरड, साळवे सुकेशनी आदीसह प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.



युवा प्रशिक्षणार्थ्यांचे विद्यावेतन देण्यास कौशल्य विभागाकडून टाळाटाळ

# राष्ट्रभक्ती, एकात्मतेचा संदेश देत साजरा झाला प्रजासत्ताक महोत्सव

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील योगेश्वरी शिक्षण संस्था,योगेश्वरी कर्मचारी पतसंस्था, छात्रसेना यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या अनेक वर्षापासून प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रजासत्ताक महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या महोत्सवांतर्गत संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या तसेच विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा आयोजित करण्यात येतात. या स्पर्धा अंतर्गत सर्व विभागाचे कर्मचारी एकत्रित येऊन राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देतात पतसंस्थेचे अध्यक्ष बालासाहेब मसने पदाधिकारी रवि कदम, राजु साळवी, विकास सातपुते,एस. एन.धावडकर, संचालक तसेच कर्मचारी बी.सी.स्वामी,वैभव चौसाळकर,चंद्रकांत कांबळे,प्रकाश आकुसकर हे या स्पर्धा आयोजित करताना राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रीय बंधुभाव तसेच राष्ट्रभक्तीचा संदेश देण्यासाठी प्रयत्नशील असतात. प्रजासत्ताक महोत्सव अंतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा त्यात वक्तृत्व स्पर्धा ज्यामध्ये राष्ट्रीय ऐक्य टिकवण्यासाठी असणारे विषय वाढते प्रदूषण मग ते वैचारिक, सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय याचा अभ्यास केला जातो. व वक्ते यातून विविध विषयांचा अभ्यास करत आपले विचार प्रगट करतात. तसेच नामवंत आणि विचारवंत वैविध्यपूर्ण विषयांवर अभ्यास करत कर्मचारी वक्तृत्वाचे सादरीकरण करतात कर्मचाऱ्यांच्या रांगोळी स्पर्धेत विशेषतः महिला कर्मचारी या राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण संतुलन, पर्यावरण रक्षण,विविध शैक्षणिक धोरणांविषयी रांगोळी काढून महत्त्वाचा संदेश देण्याचा प्रयत्न करतात. स्पर्धांमधून सुबक आणि सुंदर रांगोळी काढल्या जातात कर्मचाऱ्यांच्या क्रिकेट स्पर्धा यात विविध विभागातून आपले वय विसरून कर्मचारी क्रिकेट खेळत असतात. क्रिकेट खेळत असताना अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात अंतर्गत ऐक्य साधण्याचा प्रयत्न केला जातो. खेळाडू स्वखर्चाने आपापल्या संघांचे गणवेश परिधान करून विविधतेतून एकता निर्माण करण्याचा प्रयत्न करत असतात. कोण पराभुत झाले कोण विजयी झाले या पेक्षा आपण खिलाडू वृत्ती निर्माण करू शकलो हाच संदेश दिला जातो महिलांच्या संगीत खुर्ची स्पर्धा शटल बॅडमिंटन स्पर्धा (पुरुष आणि महिला ) प्रजासत्ताक दिनी विद्यार्थ्यांच्या समूह नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात येतात. योगेश्वरी शिक्षण संस्थे अंतर्गत विविध विभागातील सर्व वयोगटातील विद्यार्थी आपले नृत्य ध्वजारोहणानंतर अतिशय रोमहर्षक पद्धतीने सादर करत असतात. यासाठी विविध विभागातील प्राध्यापक,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी त्यांची दैनंदिन सराव घेऊन पारितोषिके मिळवण्याच्या दृष्टीने यासाठी मेहनत घेत असतात. या सर्व स्पर्धांचे बक्षीस वितरण प्रजासत्ताक दिनी सादरीकरणानंतर योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांचे हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत झाले यावेळी दिल्ली येथील कर्तव्यपथावर ज्या प्रकारे सैन्य दलातील जवानांची परेड होते त्याच धर्तीवर ५१ महाराष्ट्र बटालियन छात्र सेनेच्या वतीने अंबाजोगाई मधील विविध महाविद्यालयातील छात्र सैनिकांचे पथसंचलन होत असते. हे दृश्य म्हणजे आपण अंबाजोगाईत राहून दिल्लीतील कर्तव्यपथावरील संचलन पहिल्याची अनुभूती येते स्पर्धेसाठी शहराच्या विविध स्तरातील महिला,पुरुष मोठया संख्येने उपस्थित होते.



### योगेश्वरी कर्मचारी पतसंस्थेचा अनेक वर्षापासूनचा उपक्रम



# तब्बल ४५ वर्षांच्या खंडानंतर राजकिशोर मोदी यांच्या इयत्ता ८ वी मधील विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तब्बल ४५ वर्षाच्या कालखंडानंतर अंबाजोगाई नगर परिषदेचे माजी अध्यक्ष राजकिशोर मोदी व त्यांच्या सोबत इयत्ता ८ वी मध्ये शिकत असलेले त्यांचे शालेय वर्गमित्र यांचा २६ जानेवारी रविवार प्रजासत्ताक दिनी ३० ते ३५ विद्यार्थ्यांचा स्नेह मिलन सोहळा मोदी लर्निंग सेंटरच्या फार्मसी महाविद्यालयात संपन्न झाला. ४५ वर्षानंतर देखील जमा झालेले अनेक वर्गमित्र एकमेकांना त्याच्या नावानिशी ओळखताना दिसून आले. सर्व प्रथम राजकिशोर मोदी यांनी उपस्थित सर्व वर्गमित्रांचे फेटा बांधून व श्री योगेश्वरी देवीची प्रतिमा देऊन सर्वांचे स्वागत केले.

तब्बल ४५ वर्षानंतर शाळेतील वर्गमित्रांचा स्नेह मिलन सोहळा घडून आला. वर्गमित्रांच्या या स्नेहमिलनात एकमेकांनी शाळेतील त्या सोनेरी दिवसांच्या विविध आठवणीना उजाळा दिला. त्या काळामध्ये कोण कशा खोड्या करायचा, कोण अभ्यासात हुशार होते तर कोण क्रीडा विभागात निपुन होते याबाबत सविस्तर अशी चर्चा घडली . त्यानंतर अतिशय आस्थेवाईकपणे त्याच्यात कौटुंबिक चर्चा झाली

इयत्ता ८ वि मधील ३० ते ३५ मित्र ४५ वर्षानंतर एकत्र जमले होते. जमा झालेल्या मित्रांमध्ये कोणी मुंबई, छत्रपती संभाजी नगर, पुणे,अकोला अशा वेगवेगळ्या ठिकाणाहून एकत्र आले होते. या भेटी दरम्यान सर्वांमध्ये हास्यकल्लोळ, कुमारवयातील गप्पा टप्पा चांगल्याच रंगल्या. या सर्व सवंगड्यांना ४५ वर्षानंतर भेटून सुद्धा आपण नुकतेच भेटल्याची भावना निर्माण झाल्याचे दिसून आले.जुन्या आठवणींना सर्वांनी उजाळा देत स्नेह भोजनांचा आनंद लुटला. अशा भेटी वारंवार व्हाव्यात असा संकल्प उपस्थित सर्व वर्गमित्रांनी एकमेकात ठरवला. उपस्थित वर्गमित्रांमध्ये अच्युत हंगे, नरसिंग चिक्षे, पुरुषोतम भुतडा, ओमप्रकाश इंदाणी,हरीचंद्र बडेरा, ओमप्रकाश मुंदडा, संजय काटे ,मिलिंद बाभुळगांवकर, शिरीष खेडगीकर , नागेश नागापूरकर, सुनील राऊतमारे, प्रकाश सरवदे,सुनील पिंपळकर , अनीरुध्द जहागीरदार, नरेंद्र सोळंकी, मंगेश केतकर, राहुल दुधमाडे,गणेश सूर्यवंशी, बसलींग हारंगुळे,चंद्रकांत देशमुख रवी देशपांडे, सुनील जीरे,प्रमोद कदरे मोहन वैद्य, तहकिश कुलकर्णी, सुनील हाजारी,अजय हाजारी, सुरेश कुलकर्णी, शंकर हारेगांवकर, नरसिंग कदम, नंदकुमार बर्दापुरकर, मुकुंद देशपांडे, ज्ञानोबा मुंडे ,रमेश देशपांडे, अरुण डुबे, बाबासाहेब चव्हाण, अरुण कुलकर्णी, धनंजय गोरे , नितीन मार्कडे , सुनील गोस्वामी, अच्युत हंगे , अजय दिख्खत यांचा समावेश होता. पस्थित अनेक मित्रांनी आपली भूमिका मांडताना राजकिशोर मोदी यांचे कौतुक केले. अनेक मित्रांनी त्यांनी सामाजिक, राजकिय ,शैक्षणिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल अभिनंदन केले. त्यांनी अंबाजोगाई सारख्या छोट्या शहरात विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण उपलब्ध करुन देऊन येथील विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाची दारे खुली करून दिल्याचे अभिमानाने सांगितले.

पान ६ वरून...

### जयदीप गायकवाड यांचे शिव

अविनाश कांबळे, कुलदिप गंगावणे, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे,नगरसेवक सुरेश वारंगुळे,माजी नगरसेवक दिपक निकाळजे,प्रा.निखिल मिलिंद निकाळजे, अमोलराजे शिंदे,अफसर शेख,शशिकांत कन्हेरे, जावेद शेख,अस्ताक शेख,चेअरमन अरूण सायकड, सेवानिवृत्त पोलिस निरीक्षक मिलिंद निकाळजे,दिलीप राऊत, राजाभाऊ निकाळजे, संजय मेहेर,राजेंद्र मेहेर, नवीन कासवा, बाळासाहेब गोल्हार, महेंद्र घोडके,डॉ.युवराज तुपारे,राजेंद्र बोराडे, सेवानिवृत्त पीएसआय अरूण कांबळे,विठ्ठल नरवडे, रूपेश निकाळजे,ॲड किशोर निकाळजे, कुणाल निकाळजे, इंजिनिअर गहिनीनाथ सिरसाठ,सादिक कुरेशी, सरपंच अजित घुले,सुधीर पठाडे,माजी सरपंच राम धुमाळ, नवनाथ नागरगोजे, केशव बांगर,भगवान सांगळे,रावसाहेब पाटील नागरगोजे,शरद खांडवे, जालीदर खांडवे,शुभम खांडवे, गणेश टकले, बाळासाहेब खांडवे, डॉ. मच्छिंद्र खांडवे,अरूण खांडवे,हनुमान गायकवाड,संजय गायकवाड,बाळु गायकवाड,कुमार गायकवाड,आजिनाथ सांगळे,परमेश्वर सांगळे, ज्ञानेश्वर विधाते,हरि टकले,विनोद ससाणे, संतोष बोराडे,श्रीरंग सातपुते,महेश गायकवाड,दत्तु गावडे, ॲड.प्रविण डोंगरे,अमर शेख,पत्रकार मैनुद्दीन तांबोली(जामखेड ),अविनाश कदम, अनिरुद्ध धर्माधिकारी, अविशात कुमकर,अक्षय विधाते,संतोष नागरगोजे,शरद गर्जे,सलवार शेख,बळी खांडवे,श्रीधर खांडवे, लक्ष्मण बांगर,राज राऊत,सचिन ससाणे, फेरोज शेख, दादा सानप,सुधीर बचाते आदी राजकीय , सामाजिक ,धार्मिक व क्रिडा आदि मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना आ.धस म्हणाले की,आजकाल धकाधकीच्या जीवनात आजारांचा धोका वाढत आहे.त्यामुळे नागरीकांनी आरोग्याबाबत जागरूक राहिले पाहिजे. निरोगी आणि तंदुरुस्त राहण्यासाठी दिवसातून किमान एक तास तरी व्यायाम करावा. आपण दररोज ३० मिनिटे जीम करतो. जीममध्ये व्यायाम करणे फायद्याचे मानले जाते. त्यामुळे नागरीकांनी दररोज जिम करुन सोबत न्युट्रीशन घेतले पाहिजे. लाखात एखादी दुर्घटना घडते की, जीम करताना मृत्यू झाला परंतु यामुळे फिटनेसकडे दुर्लक्ष न करता बाकीच्या लोकांनी जिम करुन प्रोटीनसह सकस आहार घ्यावा. सकाळीचं जेवन राजासारख असलं पाहिजे तर दुपारी साधारण संध्याकाळी भिकारी म्हणजे ज्याला मिळत नाही असे जेवन केले पाहिजे असाही सल्ला आ.सुरेश धस यांनी दिला.

प्रजासत्ताकदिनी शिव न्युट्रीशन सप्लीमेंट अँन्ड हेल्थ सेंटरचे आ.सुरेश धस यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

### जिल्ह्यातील भ्रष्टाचार

देऊन भ्रष्टाचार थांबणार नाही. तर या कार्यकर्त्यांनी लोक जागृतीसाठी देखील पुढे आले पाहिजे. तरच भ्रष्टाचार कमी होण्यास मदत होईल.

या कार्यक्रमास दोन्ही प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक नवनाथ नाईकवाडे यांनी केले. तर फिर्यादीतर्फे पत्रकार अशोक काळकुटे यांनी मत व्यक्त केले. कार्यक्रमाला तुषार पाटील, भागवत वराट, शेख यासीन पाशा, डॉ. भगीरथ भांड, बलभीम बजगुडे, शिवाजीराव देसाई, पंडित, कैलास राऊत, यांच्यासह फिर्यादी व त्यांची सहकारी उपस्थित होते.

### पत्रकार एकता रॅलीत मोठ्या

स्तंभाच्या रक्षणासाठी निघत असलेल्या या रॅलीत जास्तीत जास्त पत्रकारांनी सहभागी व्हावे असे आवाहन एस.एम देशमुख, किरण नाईक, शरद पाबळे, सुरेश नाईकवाडे, मन्सूरभाई शेख, डिजिटल मिडियाचे अध्यक्ष अनिल वाघमारे, प्रसिध्दी प्रमूख संदीप कुलकर्णी, संभाजीनगर विभागीय सचिव रवी उबाळे, लातूर विभागीय सचिव सचिन शिवशेट्टे आदिंनी केले आहे..

### अबब...! गेवराई तालुक्यात

डीसीए इन्फ्रा चकलांबा श्री.अजमेरा हे अवैध मुरूम उत्खनन करत असल्याचे दिसून येत आहे. सदर प्रकरणी मुरूम उपसा थांबवत गेवराई तहसील कार्यक्षेत्रातील अधिकारी-कर्मचारी यांच्यावर विश्वास नसल्याने बीड तालुक्यातील मंडळ अधिकारी यांच्याकडून सदर ठिकाणाचा पंचनामा करत ईटीएस मोजणी करण्यात यावी अशी मागणी जिल्हाधिकारी बीड, जिल्हा खनीकर्म अधिकारी बीड, उपविभागीय अधिकारी बीड यांचेकडे केली आहे. गेवराई तालुक्यातील वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते यांनी सदर प्रकरणाची माहिती दिल्याने ह घोटाळा बाहेर निघत आहे.

अजय सरवदे, जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड

### कंत्राट कामगारांचा प्रीपेड

व महावितरणास वेळोवेळी उपोषण व आंदोलन च्या माध्यमातून मागणी केली आहे की, स्मार्ट विद्युत मीटर लागल्यावरही वयाच्या ६० वर्ष पर्यंत रोजगाराची शाश्वती द्यावी.नुकत्याच नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनात उर्जा सचिव यांना निवेदनही दिले.परंतु १ महिना झाला तरी,कामगार संघटनेस चर्चेला बोलावले नाही.त्यामुळे आम्हाला काम बंद आंदोलन केल्याशिवाय कुठलाही पर्याय राहिला नसून महावितरण कंपनीने सरकारकडे कामगारांच्या रोजगार निश्चितीची शाश्वती द्यावी,अन्यथा एक फेब्रुवारीपासून काम बंद आंदोलन करण्यात येणार आहे. काम बंद आंदोलनामुळे महावितरणचे आर्थिक नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी कामगारांची राहणार नाही,असे म्हटले आहे.या निवेदनात कालीदास रामरूले,रेहानेद्दीन शेख,संतोष बिचकुले,चेतन रामरूले ,प्रमोद शिंदे,ऋषी क्षीरसागर, राहुल निसरगंध, बनेश्वर रूपनर, विलास सुरवसे,माणिक घोडके,विठ्ठल गायकवाड, अशोक अंबड,दत्तात्रय शिराळकर, फुके, क्षीरसागर, विकास क्षीरसागर, शिवाजी थोरात, नितीन सोनवणे, प्रविण लोखंडे, अंबिर कुरेशी,पंकज टाकणकर, सुनिल होके,देविदास खैरमोडे,राम हजारे,भीमाशंकर स्वामी,बप्पा बलाडे,गंगाधर टापरे, अशोक भालेराव, तानाजी मिसाळ, राहुल शेटे, श्रीराम मुळे, मुहाफिज पठाण, शुभम मस्के,रविराज भालेराव, गौतम भालेराव, विश्वास पकाने आदींचे नावे आहेत.

### चौसाळ्यात जरांगे पाटील यांच्या

भाषणे झाली. त्यानंतर मंडळ अधिकारी श्री जायभाये, तलाठी श्री निर्मळ ,पोलिस प्रशासनाचे पीएसआय बनसोडे ,पो.ह.डोंगरे, बळवंत,खटाणे, मुरूमकर,घुले, ढाकणे यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. तसेच पोलीस प्रशासनाने ही कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. यावेळी सुधाकर गुंजाळ, प्रा. आबासाहेब जाधव, महंमद शरीफ, रेवण येडे, बाळासाहेब जोगदंड, श्रीमंत सोनवणे, खलील मुजावर, पांडुरंग आंधळे, सुभाष चव्हाण, पंजाब वाघमारे, रविंद्र जोगदंड, विकास शिंदे, शहादेव जोगदंड, राजेंद्र वाघ, बिभीषण जोगदंड, अमोल कांबळे, कोंडीराम जोगदंड, फुलचंद येडे, आदिनाथ नाईकवाडे, श्रीराम काशीद, उमेश नाईकवाडे, अनिल टाके, शकील सय्यद, सुनील नाईकवाडे, पंजाब नाईकवाडे, संजय भिल्लारे, श्रीमंत नाईकवाडे, रितेश शिंदे, भागवत गोलेकर, खदीर पठाण, कुणाल जाधव, बाबुराव गायकवाड, बाळासाहेब राऊत, जालिंदर हावळे, संतोष जोगदंड, आरुण झोडगे, शेरा नाईकवाडे, दिपक जोगदंड, विठ्ठल बोरखेडे, बब्रुवाहन जगताप, भास्कर कवाडे, यांच्यासह चौसाळा सर्कल मधील सकल मराठा बांधवा बरोबर सर्व जाती धर्माच्या नागरिकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# सोयाबीन खरेदीला मुदत वाढ द्या; केंद्र सरकारला राज्य सरकारचा प्रस्ताव



मुंबई : राज्यातील सोयाबीन खरेदीला मुदत वाढ मिळावी अशी मागणी करणारा प्रस्ताव केंद्रीय कृषी मंत्रालयाला पाठवण्यात आला, अशी माहिती राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिली. सोयाबीन खरेदीची अंतिम मुदत ३१ जानेवारी आहे. परंतु नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची खरेदी अद्यापही बाकी आहे. त्यामुळे सोयाबीन खरेदीला मुदत वाढ देण्यात यावी, तसेच भावांतर योजना लागू करावी अशी मागणी राज्यातील शेतकरी करत आहेत.

लातूर जिल्ह्यातील खरेदीचं उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. त्यामुळे लातूर जिल्ह्यातील सोयाबीन खरेदी मंगळवारी बंद करण्यात आली. परंतु नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची अद्यापही खरेदी करण्यात आली नाही. त्यामुळे आक्रमक झालेल्या सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर ट्रॅक्टर मोर्चा काढला. त्यानंतर लातूर जिल्ह्यातील आमदार अभिमन्यू पवार यांनी पणनमंत्र्यांना खरेदीला मुदत वाढ देण्याबाबत मागणी केली. या मागणीनुसार लातूर जिल्ह्याला आता २० हजार टन सोयाबीन खरेदीच्या वाढीव उद्दिष्टाला मंजूरी देण्यात आली, असंही मंत्री रावल यांनी सांगितले. राज्यात सोयाबीन खरेदीच्या गोंधळावरून शेतकरी नाराज आहेत. खरेदी केंद्रावरील खरेदीचा वेग संथ आहे. तसेच मागील दोन आठवडे बारदाण्याच्या तुटवड्यामुळे खरेदी रखडली होती. आता खरेदी सुरू असली तरी अंतिम मुदतीला केवळ तीन दिवस शिल्लक आहेत. परंतु अद्यापही नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी ५१ टक्के शेतकऱ्यांची खरेदी बाकी आहे. तर ज्या शेतकऱ्यांनी विक्री केली आहे, त्यांचे पेमेंट अद्यापही थकीत आहे. त्यामुळे राज्य सरकारने खरेदीसाठी मुदत वाढ द्यावी आणि खरेदी केंद्रावर विक्री केलेल्या शेतकऱ्यांचे पेमेंट तातडीने जमा करावेत, अशी मागणी सोयाबीन उत्पादक करत आहेत. तसेच ज्या शेतकऱ्यांनी सोयाबीन खुल्या बाजारात विकलं आहे, अशा शेतकऱ्यांना तातडी भावांतर योजनेतून प्रतिक्विंटल दोन हजारांची भाव फरक द्यावा, अशी मागणी शेतकरी करत आहेत. यंदाच्या खरीप हंगामात मॉन्सूनने शेतकऱ्यांना साथ दिली. त्यामुळे सोयाबीन उत्पादकांना चांगल्या दराची अपेक्षा होती. परंतु आवकेच्या हंगामापासून सोयाबीन हमीभावाच्या खाली राहिले. त्यामुळे केंद्र सरकारने ४ हजार ८९२ रुपये प्रतिक्विंटल हमीभावाने सोयाबीन खरेदीचा निर्णय घेतला. परंतु सुरुवातीपासूनच सोयाबीन खरेदीला विघ्न लागलेली आहेत. त्याचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसला आहे.

दरम्यान, यापूर्वी केंद्र सरकारने १२ जानेवारीपर्यंत करण्यात येणाऱ्या सोयाबीन खरेदीला ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिली होती. राज्यात एकूण १४ लाख १३ हजार टनांच्या खरेदी उद्दिष्टापैकी २५ जानेवारीपर्यंत ७ लाख ८१ हजार ४४७ टन सोयाबीनची खरेदी करण्यात आल्याची माहिती रावल यांनी दिली आहे.

## काबुली चण्याची नवी जात दुष्काळातही राहते टिकून



आयसीएआर आणि आयएआरआय या सरकारी संशोधन संस्थांनी पुसा जेजी १६ या काबुली चण्याची दुष्काळ सहन करणारे वाण विकसित केली आहे. या जातीमध्ये मध्य भारतात चिकूचे उत्पादन वाढविण्याची क्षमता आहे. या जातीमध्ये मध्य भारतात कबुली चण्याचे उत्पादन वाढविण्याची क्षमता आहे. भारतीय कृषी संशोधन परिषद ()-भारतीय कृषी संशोधन संस्था () ने जवाहरलाल नेहरू कृषी विद्यापीठ () जबलपूर, राजमाता विजयराजे सिंधिया कृषी विद्यापीठ, ग्वाल्हेर आणि , पटनचेरू, हैदराबाद यांच्या मदतीने दुष्काळ सहन करणारी वाण विकसित केली आहे. एका निवेदनात म्हटले आहे. पुसा जेजी १६ ही उच्च उत्पन्न देणारी चणा वाण विकसित केला आहे.

या भागात उत्पादन वाढेल : या जातीमुळे मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशातील बुंदेलखंड प्रदेश, छत्तीसगड, दक्षिण राजस्थान, महाराष्ट्र आणि गुजरातच्या मध्य प्रदेशातील दुष्काळी भागात उत्पादकता वाढेल. या भागात दुष्काळामुळे कधी कधी ५०-१०० टक्के उत्पादन वाया जाते. निवेदनात म्हटले आहे की, पुसा जेजी १६ ही चण्याची जात जीनोमिक सहाय्यक प्रजनन तंत्राचा वापर करून विकसित करण्यात आली आहे. अखिल भारतीय समन्वयित संशोधन कार्यक्रमाद्वारे राष्ट्रीय स्तरावरील चाचणीद्वारे या जातीच्या दुष्काळ सहनशीलतेची पुष्टी करण्यात आली.

हे वाण अनेक रोगांना प्रतिबंध करते. त्याची परिपक्वता कालावधी (११० दिवस) कमी आहे. याशिवाय हेक्टरी एक टन उत्पादन देऊ शकते. आयसीएआर-आयएआरआयचे संचालक डॉ. ए.के. सिंग यांनी वित्त मंत्रालयाने चण्याच्या या जातीच्या अधिसूचनेबद्दल आनंद व्यक्त केला आहे. देशाच्या दक्षिण विभागातील कोरडवाहू भागातील शेतकऱ्यांसाठी ही जात अत्यंत फायदेशीर ठरेल, यावर त्यांनी भर दिला. हरभरा हे कोरडे आणि थंड हवामानातील पीक आहे. याची लागवड रब्बी हंगामात केली जाते.ऑक्टोबर आणि नोव्हेंबर हे महिने पेरणीसाठी चांगले मानले जातात. हिवाळी क्षेत्र त्याच्या लागवडीसाठी सर्वात योग्य मानले गेले आहे. २४ ते ३० अंश सेल्सिअस तापमान त्याच्या लागवडीसाठी योग्य आहे. विशेष म्हणजे हलक्या ते भारी जमिनीतही हरभरा पिकवता येतो.

## खोडवा उसासाठी खत अन पाण्याचे नियोजन

ऊस उत्पादक शेतकऱ्यांसमोर खतांवरील खर्च कमी करून उत्पादन कसं वाढवायचं हा प्रश्न असतो. फायदेशीर शेती करण्यासाठी कोणत्याही पिकातील खत नियोजन खूप महत्वाचे आहे. खोडवा उसातून भरखोस उत्पादन घेण्यासाठी खतांचे नियोजन कसे करायचे याबाबत जाणून घेतल्यास शेतकऱ्यांना याचा चांगला फायदा होईल.



सेंद्रिय खते : खोडवा उसाला हेक्टरी २५ टन कंपोस्ट खत किंवा शेण खत जमिनीत मिसळून द्यावे. साधारणपणे हेक्टरी ५०० किलो शेणखतामध्ये ६० किलो गंधक मिसळून जमिनीत द्यावे. यामुळे नत्र, स्फुरद, पालाश सारखी खते पिकास त्वरित उपलब्ध होतात. खोडवा पिकासाठी पहिल्या हप्त्यात हेक्टरी ४०० किलो सिलिकॉन द्यावे. बगला फोडून झाल्यानंतर सेंद्रिय खते सरीमध्ये द्यावीत. नंतर बैल अवजाराने मातीत मिसळावीत. खोडवा पिकामध्ये हिरवळीची पिके उदा. ताग, चवळी, लसूणघास यांची लागवड करून सेंद्रिय खतांचा पुरवठा करता येतो. सेंद्रिय खतामुळे जमिनीची भौतिक, जैविक व रासायनिक सुपिकता सुधारते.

रासायनिक खते : खोडवा पिकास नत्र, स्फुरद व पालाश या अन्नद्रव्याची गरज लागवडीच्या उसाइतकीच आहे. जमिनीचा प्रकार व पहारीच्या साहाय्याने छिद्रे पाडून रासायनिक खते दिल्यास खतांचा कार्यक्षमतेने वापर होऊन उत्पादनात वाढ होते.

पहारीने खत देण्याचे फायदे : खत मुळांच्या सानिध्यात दिल्याने त्वरित उपलब्ध होते. रासानिक खतांचा प्रत्यक्ष वातावरणाशी संबंध येत नसल्याने हवेद्वारे खतांचा ऱ्हास कमी होतो. खत मातीने झाकल्याने वाहून जात नाही, खतांचा कार्यक्षम वापर होऊन पिकांच्या गरजेनुसार खते हळूवारपणे उपलब्ध होतात. सर्व ठिकाणी समप्रमाणात खत देणे शक्य होते.

सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर : खोडवा पिकात लोह कमतरतेमुळे केवड्याचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. केवडा नियंत्रणासाठी ५ ग्रॅम फेरस सल्फेट, ५ ग्रॅम झिंक सल्फेट, ५ ग्रॅम मँगनीज सल्फेट, २५ ग्रॅम युरिया प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. हेक्टरी फवारणीसाठी १००० लिटर पाणी लागते. १० ते १५ दिवसांच्या अंतराने ३ फवारण्या कराव्यात किंवा मल्टिमॅक्रोन्यूट्रियंन्ट आणि मल्टिमायक्रोन्यूट्रियंन्ट द्रवरूप खताचा वापर करावा. पहिल्या फवारणीवेळी (६० दिवसांनी) मल्टिमॅक्रोन्यूट्रियंन्ट ५ लिटर अधिक मल्टिमायक्रोन्यूट्रियंन्ट ५ लिटर हे ५०० लिटर पाण्यात मिसळून संध्याकाळच्या वेळी पानांवर फवारणी करावी. दुसरी फवारणी (९० दिवसांनी) मल्टिमॅक्रोन्यूट्रियन्ट ७.५ लिटर आणि मल्टिमायक्रोन्यूट्रियंन्ट ७.५ लिटर प्रति ७५० लिटर पाण्यात मिसळून प्रतिहेक्टरी संध्याकाळी पानांवर फवारणी करावी.

जिवाणू खतांचा वापर : रासानिक खतांना पूरक म्हणून जिवाणू संवर्धकांचा वापर करून खत मात्रेमध्ये बचत करता येते. हेक्टरी २.५ लिटर द्रवरूप ॲझोफॉस्फो ५०० किलो शेणखतामध्ये मिसळून ऊस तुटल्यावर दुसरे पाणी देण्याच्या आधी सरीत चळी घेऊन द्यावे. शिफारशीनुसार खोडवा ठेवल्यानंतर दोन महिन्यांनी ॲसिटोबॅक्टर तीन लिटर प्रति ७५० लिटर पाण्यात मिसळून प्रतिहेक्टरी फवारणी करावी. ४५ ते ६० दिवसांनी पीक वाढीसाठी उपयुक्त जिवाणू खत ३ लिटर प्रति ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रतिहेक्टरी फवारणी करावी. जमीन सुधारणेसाठी उपयुक्त जिवाणू खत १० लिटर प्रति ५०० लिटर पाण्यात मिसळून लागवडीच्या वेळी व लागवडीनंतर ४५, ६० व ९० दिवसांनी आणि खोडवा पिकात ऊस तुटल्यानंतर १५ दिवसांच्या आत आणि त्यानंतर ३०, ४५ व ६० दिवसांनी चार वेळा समप्रमाणात सरीमध्ये उसाच्या बुंध्याजवळ आळवणी करावी.

पाणी व्यवस्थापन : ऊस तुटून गेल्यानंतर १५ दिवसांच्या आत खताची पहिली खतमात्रा दिल्यानंतर पहिले हलके पाणी द्यावे. त्यामुळे उसाची चांगली फूट होते.

पाणी देण्याची पद्धत आणि जमिनीच्या मगदुराप्रमाणे दर १२ ते १५ दिवसांच्या अंतराने पाण्याची पाळी द्यावी. पट्टा पद्धतीमध्ये जोड ओळीमधील सरीला पाणी द्यावे. खोडवा पिकामध्ये नेहमीच्या पद्धतीने २६ ते २८ पाण्याच्या पाळ्या लागतात. परंतु नवीन तंत्रामध्ये पाचटाचे आच्छादन केल्यास १३ ते १४ पाण्याच्या पाळ्या दिल्यास खोडव्याचे चांगले उत्पादन मिळते. खोडवा उसाचा पाचट आच्छादन केलस दोन पाण्याच्या पाळीतील अंतर दीडपटीने वाढवावे.

ठिबक सिंचन पद्धतीचा वापर : लांब-रुंद सरी किंवा जोडओळ लागवड पद्धतीच्या खोडवा पिकामध्ये ठिबक सिंचनाचा वापर करावा. मुळांच्या कक्षेत पाणी, हवा यांचे प्रमाण साधून पीक वाढीच्या अवस्थेनुसार खत व पाणी व्यवस्थापन केल्याने उत्पादनात वाढ होते. पाण्यात विरघळणारी खते (युरिया, फॉस्फोरिक ॲसिड आणि पांढरा पोटॅश) मुळांच्या सहवासात दिल्याने खतांच्या मात्रेत ३० ते ४० टक्के बचत होते. खोडवा पिकात वाफसा राखल्याने गांडूळे आणि उपयुक्त जिवाणूंची संख्या वाढते. पाचट लवकर कुजून जमिनीची जैविक, रासानिक व भौतिक उपयुक्तता वाढते. खोडवा पिकामध्ये पाचट आच्छादन, ठिबक सिंचनाच्या वापरामुळे ४५ ते ५० टक्के पाण्याची बचत होते. ठिबक सिंचन पद्धतीने पाणी व खताचा काटेकोर वापर करून खोडवा पिकाचे लागवडीच्या उसा इतके किंवा त्यापेक्षा अधिक उत्पादन घेणे शक्य आहे.

## दिन विशेष

### जागतिक दिवस: कुष्ठरोग निवारण दिन

### महत्वाच्या घटना

१६४९ : इंग्लंडचा राजा पहिला चार्ल्स याचा शिरच्छेद करण्यात आला.
१९३३ : ॲडॉल्फ हिटलरचा जर्मनीचा राष्ट्राध्यक्ष (चॅन्सेलर) म्हणून शपथविधी झाला.
१९४८ : नथुराम गोडसे याने मोहनदास करमचंद ऊर्फ 'महात्मा' गांधी यांचा सायंकाळी ५ वाजून १७ मिनिटांनी प्रार्थना करीत असताना गोळ्या घालून खून केला.
१९७१ : आजच्या दिवशी फोकर फ्रेंडशिप विमान चे अपहरण झाले होते.
१९७२ : आजच्या दिवशी कॉमनवेल्थ मधून पाकिस्तान बाहेर निघाले.
१९९४ : पीटर लेंको बुद्धिबळातील सर्वात लहान वयाचा ग्रँडमास्टर झाला.
१९९७ : महात्मा गांधीच्या अस्थींचे त्यांचे पणतू तुषार अरूण गांधी यांनी अलाहाबाद येथील संगमात विसर्जन केले. ४७ वर्षे या अस्थी कटकमधील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या लॉकरमध्ये होत्या.
१९९९ : पण्डित रविशंकर यांना 'भारतरत्न'
२००४ : मंगळावर पाठविलेल्या अपॉर्चुनिटी अंतरीक्ष यानाने मंगळावर आयरन ऑक्साइड (गंज) असल्याचे शोधल्या गेले.
२००८ : चेन्नई च्या विशेष न्यायालयाने स्टॅम्प घोटाळ्यातील मुख्य आरोपी अब्दुल करीम तेलगी ला न्यायालयाने १० वर्षाची शिक्षा सुनावली.
२००९ : ऑस्ट्रेलिया च्या मिक्स ओपन मध्ये सानिया मिर्झा आणि महेश भूपती यांची जोडी अंतिम फेरीत पोहचले.
२००९ : कोका कोला क्लासिक चे नाव बदलवून कोका कोला करण्यात आले.
२०१६ : दक्षिण कोरिया ने त्याचे पहिले रॉकेट रॉकेट नारो-१ चे यशस्वी प्रक्षेपण केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८२ : फ्रँकलिन डी. रुझव्हेल्ट अमेरिकेचे ३२ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १२ एप्रिल १९४५)
१८८९ : हिन्दी भाषेतील प्रसिद्ध कवी जयशंकर प्रसाद यांचा जन्म.
१९१० : सी. सुब्रम्हण्यम गांधीवादी नेते, केन्द्रीय मंत्री व महाराष्ट्राचे राज्यपाल (मृत्यू: ७ नोव्हेंबर २०००)
१९११ : पं. गजाननबुवा जोशी शास्त्रीय गायक (मृत्यू: २८ जून १९८७)
१९१३ : प्रसिद्ध चित्रकार अमृता शेरगिल यांचा जन्म.
१९१७ : वामन दत्तात्रय पटवर्धन स्फोटके व शस्त्रास्त्र तज्ञ (मृत्यू: २७ जुलै २००७)
१९२७ : ओलोफ पाल्मे स्वीडनचे २६ वे पंतप्रधान (मृत्यू: २८ फेब्रुवारी १९८६)
१९२९ : रमेश देव हिंदी, मराठी चित्रपटांतील व रंगभूमीवरील अभिनेते, निर्माते व दिग्दर्शक
१९३७ : भारतीय न्यायाधीश के.टे. थॉमस यांचा जन्म.
१९४९ : डॉ. सतीश आळेकर नाटककार, दिग्दर्शक आणि निर्माते, 'थिएटर ॲकॅडमी'चे एक संस्? थापक,' नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'चे संचालक, साहित्य अकादमी पारितोषिक विजेते
१९५१ : भारताचे केंद्रीय पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर यांचा जन्म.
१९७५ : भारतीय कलाकार अनुप सोनी यांचा जन्म.
१९८० : छोट्या पडद्यांवरील कलाकार गुरदीप कोहली यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५२८ : राजपूत राजवंशाचे राजा राणा संग्राम सिंह यांचा जन्म.
१९४८ : ऑर्व्हिल राईट आपला भाऊ विल्बर राईट याच्यासह इंजिनाच्या विमानाचा शोध लावणारे अमेरिकन अभियंते (जन्म: १९ ऑगस्ट १८७१)
१९४८ : महात्मा गांधी (जन्म: २ आक्टोबर १८६९)
१९५१ : फर्डिनांड पोर्श ऑस्ट्रियन वाहन अभियंता (जन्म: ३ सप्टेंबर १८७५)
१९६० : प्रसिद्ध लेखक, समाजसेवक, नाथूराम प्रेमी यांचे निधन.
१९६० : गांधीवादी व्यक्तिमत्व जे.सी. कुमारप्पा यांचे निधन.
१९६८ : प्रसिद्ध लेखक, कवी, माखन लाल चतुर्वेदी यांचे निधन.
१९९६ : गोविंदराव पटवर्धन हार्मोनियम व ऑर्गन वादक
२००० : आचार्य जनार्दन हरी चिंचाळकर मानववंशशास्त्रज्ञ व सामाजिक कार्यकत
२००४ : रमेश अणावकर गीतकार

## चांगली मागणी असलेल्या ओरेगॅनोचे लागवड तंत्र

आधुनिकीकरणामुळे लोकांच्या राहणीमानात आणि खाण्याच्या सवयींमध्ये बदल झाला आहे. आता पारंपरिक पिकांऐवजी औषधी, विविध प्रकारच्या पानांची मागणी खूप वाढली आहे. शेतकऱ्यांनी या जागतिक पिकांचे उत्पादनही सुरू केले आहे, त्यामुळे पिकांना चांगला भाव मिळतो. ओरेगॅनो हे असेच एक पीक आहे. बाजारात ओरेगॅनोची मागणी वाढू लागली आहे. पूर्वी फक्त पिझ्झा, पास्ता यांसारख्या इटालियन खाद्यपदार्थांमध्ये याचा वापर केला जात होता, परंतु आता सर्व प्रकारच्या खाद्यपदार्थांमध्ये त्याचा वापर केला जात आहे. अशा परिस्थितीत शेतकरी ओरेगॅनोची लागवड करून चांगला नफा मिळवू शकतात.

ओरेगॅनो म्हणजे काय? : ओरेगॅनो पुदीना कुटुंबातील एक सदस्य आहे. ही कुटुंबातील एक वनस्पती आहे. काही भागात त्याला वन तुळशी म्हणतात. त्याची फुले गुलाबी, जांभळ्या आणि पांढर्या रंगाची असतात, त्याची चव ओव्याप्रमाणे तेज असते. त्यात अनेक प्रकार आहेत. यापासून तेलही बनवले जाते. ओरेगॅनो लागवडीसाठी योग्य माती आणि हवामान जाणून घेऊया- ६ ते ८ पीएच मूल्य असलेली कोरडी, वालुकामय जमीन ओरेगॅनो लागवडीसाठी योग्य आहे, मातीचा निचरा चांगला असावा. त्याच्या लागवडीसाठी उष्णता आणि अधिक सूर्यप्रकाश आवश्यक आहे. थंड हवामानात दंव संरक्षण आवश्यक आहे.

शेताची तयारी : ओरेगॅनो पेरण्यापूर्वी शेताची पूर्णपणे नांगरणी करा. कल्टिव्हेटर चालवा जेणेकरून माती भुसभुशीत होईल किंवा नंतर पेलवा बनवा. यानंतर जमिनीत सेंद्रिय पदार्थ असलेले कंपोस्ट टाकावे. ओरेगॅनोच्या चांगल्या वाढीसाठी दाणेदार सेंद्रिय खत वापरा.

लागवड पद्धत : ओरेगॅनो दोन प्रकारे शेतात लावता येते. प्रथम बियाणे पद्धतीने, दुसरे ग्राफ्टिंग पद्धतीने. बियाणे पद्धतीने पेरणी करण्यासाठी बियाणे १२ ते १५ इंच अंतरावर शेतात लावावे. ओरेगॅनो झाडे पसरतात, त्यामुळे बियांमधील अंतर महत्त्वाचे आहे. दुसरीकडे, ग्राफ्टिंग पद्धतीने पेरणी करण्यापूर्वी, झाडांच्या कटिंगमध्ये मुळे वाढवणे आवश्यक आहे. मुळे बाहेर आल्यानंतरच प्रत्यारोपण करा.

बिया/वनस्पती कोठे मिळतील : तुम्हाला ओरेगॅनोच्या विविध जातींचे बिया ऑनलाइन मिळतील, त्याशिवाय तुम्ही जवळच्या रोपवाटिकेतूनही माहिती मिळवू शकता.

वनस्पतींमध्ये सिंचन : ओरेगॅनो झाडांना कमी सिंचनाची आवश्यकता असते. मात्र, रोप लावल्यानंतर लगेच पाणी द्यावे, त्यानंतर माती पूर्णपणे कोरडी झाल्यानंतर पाणी द्यावे. शेतात पाणी साचू नये याची काळजी घ्यावी.

रोपांची निगा : ही झाडे १ ते २ फूट उंच असतात. जेव्हा झाडे ४ इंच उंच असतात, तेव्हा काही पाने तोडून घ्या आणि नियमित छाटणी करा. मृत देठ कापत रहा.

ओरेगॅनोचे प्रकार : रोझेनकुप्पेल, ऑरियम, चार्ली गोल्ड यासह ओरेगॅनोचे अनेक प्रकार बाजारात उपलब्ध आहेत.

काढणी : फुलांच्या नंतर झाडांची चव बदलते, म्हणून फुलांच्या आधी पाने काढणी करा. यानंतर पाने गोळा करून गुठळ्या तयार करून वाळवाव्यात. या वाळलेल्या पानांचे भाव बाजारात चांगले आहेत. याशिवाय ओल्या पानांपासून सर्व प्रकारच्या सॉस आणि चटण्या बनविल्या जातात, ज्यांना बाजारात चांगली मागणी आहे, तसेच ओरेगॅनोचे तेलही बनवले जाते. त्याच्या लागवडीसह, आपण प्रक्रिया युनिट स्थापित करून अनेक पटींनी नफा मिळवू शकता.



# व्यवहारज्ञानाच्या धड्यासाठी आनंदनगरीचे आयोजन

## पाटोद्याच्या झेडपी शाळेचा उपक्रमः पालकांसह ग्रामस्थांचीही उपस्थिती

पाटोदा : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाटोदा येथे उपशिक्षणाधिकारी विपुल भागवत यांच्या मार्गदर्शनात मंगळवारी आनंदनगरीचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी पालकांच्या मदतीने शाळेच्या प्रांगणात स्टॉल लावून ५३ दुकाने थाटली होती. अस्सल गावरान ठेचा भाकर, दही धपाटे, बेसन भाकरीसह वडापाव, पाणीपुरी, स्वीट, उसळ, फळे, भाजीपाला, चकली, शेव, बालुशाही, उडीद पापड, इडली, दोसा आदी चटपटीत पदार्थांचा समावेश दुकानात समावेश होता. रुद्र वायाळ, आनंता चव्हाळ, रुद्रांश जोशी, सौरभ नजान, सोहम काळे, माधुरी बोराडे, अक्षरा परभने, ईश्वरी घोंगडे, समर्थ काळे, यशवंत बोराडे, विठ्ठल डोळझाके, वेदिका अंभुरे, कालिका जाधव, समृद्धी बोराडे, स्वरूपा काळे, अक्षदा बोराडे, ईश्वरी सावंत, ईश्वरी खरात, संस्कृती बोराडे, नंदिनी पारधे, शुभांगी नजान, स्वरा मोरे, निकिता वायाळ, समर्थ बोराडे, कृष्णा बोराडे, शिवम बोराडे, महादेव श्रावणे या विद्यार्थ्यांनी वेगवेगळे पदार्थ बनवून आणले होते.



उद्घाटन सरपंच अशोकराव बोराडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी रतन बोराडे, नामदेव बोराडे, अनिल बोराडे, गजानन अंभूरे, दत्ता मोरे, महादेव हारके, दीपक मोरे, अमोल बोराडे, रामा आंभुरे, मधुकर बोराडे, भगवान घोंगडे, राजेंद्र पारधे, विष्णू बोराडे, अर्जुन बोराडे, महादेव सावंत, ज्ञानेश्वर राजकुंवर, परमेश्वर बोराडे, मारोती बोराडे, वैजनाथ बोराडे, युसुब पठाण,शाम काळे, अमोल पारधे, विजय मोरे, महादेव खरात, विश्वजीत राऊत, अस्लम शेख, संभाजी बोराडे,सुरेश काळे, विठ्ठल नजान, बबन डोळझाके आधी पालकांची उपस्थिती होती. जिल्हा परिषदेच्या शाळेत आनंदनगरीतून सिद्धी बोराडे, स्वरूपा बोराडे, स्वाती जाधव, गायत्री काळे, दिपाली जाधव, संध्या कांबळे, साई बोराडे, अर्णव डोळझाके, आरुष काळे, अनिकेत कांबळे, यश दळवे, अहिर शेख, स्वरूपा घोंगडे, पूजा जाधव, सावरी जोशी, दिव्यांका घुटे, श्रद्धा बोराडे, संध्या श्रावणे, लक्ष्मी चान्ने, अक्षरा कोरडे, आयोध्या सोलाट, हर्षदा बोराडे, शरद बोराडे, रतन ढाकरगे, ऋषिकेश बोराडे, विशाल पारधे, शशांक बोराडे, समर्थ बोराडे, सोबान पठाण, संस्कृती मोगल या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यवहार ज्ञानाचे धडे मिळाल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक संतोष तोटेवाड, अनुजा पाटील, गीता बरसाले, गंगाधर वानोळे यांच्यासह प्रशालेच्या शिक्षकांनी परिश्रम घेतले.

बालगोपाळांनी लावलेल्या दुकानांना भेटी देत पालकांसह ग्रामस्थांनी विविध वस्तूंची खरेदी केल्याने विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला. केंद्रप्रमुख डी.ए.चव्हाण यांनी भेट दिली तर गटसमन्वयक के.जी. राठोड यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्रशालेचे मुख्याध्यापक पी.एस.टोम्पे, एन.डी.पारसकर, पी.के.यमुलवाड, डी.आर.पांगारकर, व्ही.एन.चव्हाण, जे.ए.कनकुटे, जे. एम.डोंगरे, एस.एम.तोगरे, एन.ए.सगरे, एस.बी.ठाकूर शिक्षकांसह एम.बी.गबाळे यांनीही विविध वस्तू खरेदी करीत आनंदनगरीचा आस्वाद घेतला. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या डोक्यावरील टोप्या व दुकानांच्या नावांनी आनंदनगरीत भेट दिलेल्या प्रेक्षकांची मने जिंकली. सर्वांचे आभार सहशिक्षक गंगाधर वानोळे यांनी मांडले.

# विद्यार्थिनींनी पूर्ण केले तीन दिवसीय सेंद्रिय शेती प्रशिक्षण



बीड । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी संलग्नित सौ के. एस.के (काकु) कृषी महाविद्यालय, बीड व नांदी फाउंडेशन हैदराबाद यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या प्रक्षेत्रावर मुलींसाठी तीन दिवशी सेंद्रिय शेती प्रशिक्षण दि.२५.१. २०२५ ते २७.१. २०२५ या कालावधीत देण्यात आले.

या प्रशिक्षण दरम्यान प्रशिक्षणार्थी मुलींना सेंद्रिय शेतीचे महत्त्व तसेच त्यासाठी लागणारे निविष्ठा गोकृपा अमृत, पंचगव्य, कंपोस्ट खत, जीवामृत इत्यादी तयार करण्याच्या पद्धती व त्याचा उपयोग कसा करावा याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण ५१ विद्यार्थिनींनी घेतले. हे प्रशिक्षण देण्यासाठी नांदी फाउंडेशन हैदराबाद यांच्याकडून पाठवण्यात आलेले मास्टर ट्रेनर डॉक्टर सचिन मातले सर यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी सहसचिव डॉक्टर जी व्ही साळुंखे सर यांनी सहकार्य केले तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एस पी मोरे सर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या प्रशिक्षणाचे पूर्ण नियोजन प्रा.बी.बी. तांबोळकर तसेच डॉ. एस.टी. शिंदे यांनी केले अशा प्रकारे या महाविद्यालयात सातत्याने नवनवीन तंत्रज्ञान आधुनिक शेतीवर आधारित शिक्षण आणि प्रशिक्षणाचे उपक्रम या कृषी महाविद्यालयात सातत्याने राबविण्यात येतात. केंद्र शासनाच्या धोरणानुसार सर्वत्र नैसर्गिक शेतीचे विषमुक्त अन्न निर्मितीचे धोरण अवलंबिले जात असून या उपक्रमाची अंमलबजावणी या कृषी महाविद्यालयाने स्वतःचे प्रक्षेत्रावर याचा सर्वप्रथम वापर सुरू केला आहे. या सर्व प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनींना या संदर्भात सहकार्य करण्यात आले आहे.

## थोडक्यात



### प्रविण पोकळे यांच्या हस्ते ध्वजारोहण

आष्टी। प्रतिनिधी

७६ वा प्रजासत्ताक दिनानिमित्त आष्टी तालुका पत्रकार संघाच्यावतीने पत्रकार भवन येथे सकाळी ८:४५ मिनिटांनी आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी आष्टी तालुका पत्रकार संघाचे सर्व सन्माननीय सदस्य उपस्थित होते. देशभरात ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.त्याप्रमाणे आष्टी तालुक्यात देखील सर्व शासकीय निमशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालयात हा राष्ट्रीय सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आष्टी तालुका पत्रकार संघाच्यावतीने पत्रकार भवन येथे प्रजासत्ताक दिन अध्यक्ष प्रविण पोकळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुध्दे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष तथा संपादक दत्ताभाऊ काकडे, गणेश शेठ लाहोटी,पत्रकार भिमराव गुरव, उपाध्यक्ष संतोष सानप,पत्रकार विनोद ढोबळे, सचिव शरद रेडेकर,पत्रकार रघुनाथ कर्डिले, पत्रकार शरद तळेकर,पत्रकार सचिन रानडे, पत्रकार गणेश दळवी,पत्रकार मनोज पोकळे आदींसह नागरिक उपस्थित होते.

### शरद तळेकर यांना राज्यस्तरीय गंगाई -बाबाजी पुरस्कार जाहीर

आष्टी। प्रतिनिधी



आष्टीचे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या आनंद चॅरिटेबल ट्रस्ट संस्थेअंतर्गत दर वर्षी गंगाई बाबाजी राज्यस्तरीय पुरस्कार दिले जातात त्यामध्ये यावर्षी विविध क्षेत्रातील ३३ मान्यवरांना गंगाई बाबाजी राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात आले आहेत त्यामध्ये दैनिक चंपावतीपत्रचे आष्टी तालुका प्रतिनिधी शरद चंद्रकांत तळेकर यांना यावर्षीचा गंगाई बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे या पुरस्काराचे वितरण शनिवार दिनांक ०१ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित भव्य कार्यक्रम मध्ये अभिनेत्री चौधरी व विधान परिषदेचे अध्यक्ष राम शिंदे यांच्या हस्ते व माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पुरस्कार वितरण सोहळा होणारअसल्याचे संयोजन समितीने कळविले आहे पत्रकार शरद तळेकर यांनी गेले वीस ते बावीस वर्षापासून पत्रकार क्षेत्रामध्ये तसेच राजकीय सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांच्या कार्याची दखल घेत या संस्थेने त्यांना यावर्षीचा गंगाई बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पथकरिता पुरस्कार जाहीर केला आहे पत्रकार शरद तळेकर हे गेल्या २२ वर्षापासून पत्रकारिता व शिक्षण क्षेत्रामध्ये अविरत काम करत आहेत आष्टी तालुका पत्रकार संघाचे ते माजी अध्यक्ष असून त्यांनी आष्टी तालुक्यात विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य केले आहे त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना हा गंगाई बाबाजी राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार देण्याचा आला आहे हा पुरस्कार सायोंजन समितीच्या वतीने जाहीर करण्यात आला आहे तरी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन गंगाई बाबाजी पुरस्कार संयोजन समिती यांनी केले आहे.

# मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी रास्तारोको आंदोलन

चौसाळा । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देवून ओबीसी मधून आरक्षण देण्यात यावे व ईतर मागण्यासाठी मनोज जरांगे पाटील अंतरवली सराटी येथे (ता.२५) पासून आमरण उपोषणाला बसलेले आहेत. त्यांची प्रकृती खालावत चालल्यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये चिंता पसरली असुन महाराष्ट्र सरकारने त्यांच्या खालवलेल्या प्रकृतीची गांभीर्याने दखल घेऊन सर्व मागण्या मान्य कराव्या यासाठी बीड तालुक्यातील बालाघाटावरील चौसाळा येथे आज (ता.२९) बुधवार रोजी सोलापूर - धुळे राष्ट्रीय महामार्गावर दुपारी १२ वाजता चौसाळा बसस्थानक येथे रस्ता रोको आंदोलन सामाजिक कार्यकर्ते सतिष जोगदंड, बाळासाहेब मोरे, डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.



यावेळी सामाजिक कार्यकर्ते सतिष जोगदंड, बाळासाहेब मोरे, डॉ. गणेश ढवळे यांची समायोचित आंदोलन स्थळी भाषणे झाली. त्यानंतर मंडळ अधिकारी श्री जायभाये, तलाठी श्री निर्मळ ,पोलिस प्रशासनाचे पीएसआय बनसोडे ,पो.ह.डोंगरे, बळवंत,खटाणे, मुरूमकर,घुले, ढाकणे यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. तसेच पोलीस प्रशासनाने ही कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. यावेळी सुधाकर गुंजाळ, प्रा. आबासाहेब जाधव, महंमद शरीफ, रेवण येडे, बाळासाहेब जोगदंड, श्रीमंत सोनवणे, खलील मुजावर, पांडुरंग आंधळे, सुभाष चव्हाण, पंजाब वाघमारे, रविंद्र जोगदंड, विकास शिंदे, शहादेव जोगदंड, राजेंद्र वाघ, बिभीषण जोगदंड, अमोल कांबळे, कोंडीराम जोगदंड, फुलचंद येडे, आदिनाथ नाईकवाडे, श्रीराम काशीद, उमेश नाईकवाडे, अनिल टाके, शकील सय्यद, सुनील नाईकवाडे, पंजाब नाईकवाडे, संजय भिल्लारे, श्रीमंत नाईकवाडे, रितेश शिंदे, भागवत गोलेकर, खदीर पठाण, कुणाल जाधव, बाबुराव गायकवाड, बाळासाहेब राऊत, जालिंदर हावळे, संतोष जोगदंड, आरुण झोडगे, शेरा नाईकवाडे, दिपक जोगदंड, विठ्ठल बोरखेडे, बब्रुवाहन जगताप, भास्कर कवाडे, यांच्यासह चौसाळा सर्कल मधील सकल मराठा बांधवा बरोबर सर्व जाती धर्माच्या नागरिकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# पालकमंत्र्यांच्या त्या विधानाचा विपर्यास-बांगर

हिंगोली। प्रतिनिधी

नवनिर्वाचित पालकमंत्री माननीय नरहरी झिरवाळ साहेब हे हिंगोली दौऱ्यावर असताना त्यांच्या एका कार्यक्रमातील वाक्यावरून विपर्यास करण्यात आलेला आहे. हिंगोली जिल्हा हा गरीब जिल्हा आहे असे त्यांनी विधान केले होते. या पार्श्वभूमीवर त्यांच्या भावना ह्या हिंगोली जिल्हा हा महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांपेक्षा विकासाच्या दृष्टिकोनातून पछाडलेला आहे, अजूनही जिल्हा महाराष्ट्र शासनाच्या लेखी ना उद्योग जिल्ह्याच्या यादीमध्ये आहे. त्या दृष्टिकोनातून या जिल्ह्यात अधिकाधिक उद्योग निर्माण होणे गरजेचे आहे.



त्याचबरोबर सिंचनाचे अनेक प्रकल्प अद्यापही प्रलंबित आहेत. हे प्रकल्प मार्गी लागल्यास जिल्ह्यातील कृषी क्षेत्राला खूप मोठी चालना मिळणार आहे. शैक्षणिक स्तरावर देखील जिल्ह्यात खूप मोठी सुधारणा होणे गरजेचे आहे. जिल्हा करिता वैद्यकीय महाविद्यालय मंजूर झाले असले तरी ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था अत्याधुनिक आणि सक्षम करणे तेवढेच गरजेचे आहे. यासह जिल्ह्यातील अनेक विभागांमध्ये रिक्त असलेली पदे भरणे, अधिकाऱ्यांच्या नेमणुका असे अनेक विषय समोर असताना मराठवाड्यात हिंगोली जिल्ह्याकडे अत्याधिक लक्ष देणे गरजेचे असल्याने त्यांनी हिंगोली जिल्हा कडे राज्य शासनाने वरील विषयाच्या अनुषंगाने तात्काळ लक्ष देण्याची गरज व्यक्त केली होती. याचा अर्थ जिल्हा हा आर्थिक दृष्ट्या किंवा इतर भावनिकदृष्ट्या गरीब आहे असा होत नाही. केवळ विकासात्मक मुद्द्याच्या अनुषंगाने जिल्ह्याच्या गरजा खूप असल्याने त्यांनी हा शब्द वापरला आणि याच मुद्द्यांच्या आधारे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित दादा पवार साहेब यांच्याकडे आपण वरील विषयाच्या अनुषंगाने मागण्या प्रस्तुत करणार असल्याचे देखील त्यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसोबत बोलताना सांगितले. त्यामुळे त्यांच्या शब्दाचा विपर्यास झाला वास्तविक या बाबतीत जो गैरसमज पसरवीला गेला आहे त्याला कुठलाही अर्थ नाही असे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी हिंगोली जिल्हाध्यक्ष बी.डी.बांगर यांनी स्पष्ट केले आहे.

# वसंतदादा पाटील महाविद्यालयाच्या भाषा संकुलाची अभ्यास सहल संपन्न



पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील महाविद्यालयातील मराठी, हिंदी आणि इंग्रजी विभागाच्या वतीने अभ्यास सहलीचे नुकतेच यशस्वी आयोजन करण्यात आले. सहलीअंतर्गत जरेवाडी, तालुका पाटोदा येथील महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेला भेट देण्यात आली.

पाटोदा तालुक्यातील जरेवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेने केलेली प्रगती ही शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्यासाठी एक आदर्शाचा पायंडा असून, या शाळेनी केलेले शैक्षणिक प्रयोग सर्वांनी अंगिकारले पाहिजे. असे झाल्यास एक आदर्श समाजनिर्माणाच्या प्रक्रियेला नक्कीच गती येईल हा हेतू समोर ठेऊन वसंतदादा पाटील महाविद्यालयातील भाषा विषयांच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल पिंपळवंडी केंद्रांतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, जरेवाडी येथे आयोजित करण्यात आली होती. या अभ्यास सहलीमध्ये विद्यार्थ्यांच्या बँकेचे स्वरूप, कलादालन आणि खगोल विज्ञान यासह शाळा नियंत्रित करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या मंत्रिमंडळाचे स्वरूप समजाऊन सांगण्यात आले. याकरिता अभ्यास सहलीला मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हा परिषद शाळेने नेमून दिलेल्या सोंडगे गौरी, पवार संस्कृती, जेधे गौरी, वारे ज्ञानेश्वरी, पवार पूर्वा, पवार मानवी, सानप अश्विनी, शेख आनम, थोरवे विद्या, गंडाळ सुमित इत्यादींचा समावेश असलेल्या विद्यार्थी मार्गदर्शक मंडळाने शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमाची सविस्तर माहिती दिली.

ही अभ्यास सहल यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. आबासाहेब हांगे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. सहल यशस्वी करण्यासाठी इंग्रजी विभागप्रमुख डॉ. मनोजकुमार प्रकाश, मराठी विभागप्रमुख प्रोफेसर हमराज उईके, हिंदी विभागप्रमुख डॉ. न. पु. काळे, इंग्रजी विभागाचे डॉ. कुशाबा साळुंके, प्रा. कावेरी खुरणे, प्रा. मनीषा पाडिया, डॉ. जालिंदर लोणके, डॉ. कृष्णा नागरे, डॉ. शकुंतला बडे इत्यादींनी परिश्रम घेतले. या अभ्यास सहलीमध्ये महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# वसंतदादा पाटील महाविद्यालयाचे सेवा योजना शिबिर

पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराचे मौजे चुंबळी येथे २८ जानेवारी उत्साहात उद्घाटन संपन्न झाले. उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य आबासाहेब हांगे तर प्रमुख अतिथी म्हणून बाळासाहेब शिंदे उपस्थित होते. व्यासपीठावर देविदास जाधव, डॉ. सतीश माऊलगे, डॉ. गणेश पाचकोरे, प्रफुल्ल पवळ यांचीही उपस्थित होते.

कार्यक्रमात प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व राष्ट्रीय सेवा योजनेच्या ध्वजाचे ध्वजारोहण मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. प्रास्ताविकात राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे यांनी सात दिवसांसाठी आयोजित या विशेष शिबिरातील कार्यक्रमांची रुपरेषा स्पष्ट केली. मनोगतपर भाषणामध्ये बाळासाहेब शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनात राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व प्रतिपादित केले. देविदास जाधव यांनीही कुटुंबाची, समाजाची व देशाची सेवा करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना ही महत्त्वाची असल्याचे सांगितले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य आबासाहेब हांगे यांनी, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करावयाचा असेल तर राष्ट्रीय सेवा योजना शिवाय पर्याय नाही असे प्रतिपादन केले. तसेच सात दिवसात आयोजित करण्यात आलेल्या या विशेष शिबिरातील सर्व उपक्रमात स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जालिंदर लोणके यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. सय्यद शानूर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे सह-कार्यक्रमाधिकारी प्रा. मनिषा गाढवे, डॉ. चंद्रशेखर बनसोडे, डॉ. दिनेश राऊत, प्रा. प्रदीप मांजरे, डॉ. सय्यद शानूर, डॉ. जालिंदर लोणके, शिक्षकेतर कर्मचारी ज्ञानदेव पवार व युवराज कोकाटे यांनी विशेष परिश्रम घेतले. रासेयो स्वयंसेवक अनिल खेडकर, गीता जायभाये, शितल उगलमुगले, भाग्यश्री नागरगोजे आणि ओम घुले यांनी विशेष पुढाकार घेतला. उद्घाटन कार्यक्रमास चुंबळी येथील ग्रामस्थ आणि जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थीही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/१६
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १५/०१/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) लता शामराव भदाडे सर्वे नं. ८० प्लॉट नं. ८ न.प.मि.न.१८-११०-८१३ चे हस्तांतरण करणे बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (८) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- १५ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम :याच प्लॉट मधील भाग
दक्षिण- सर्वे नंबर ८० मधील भाग
उत्तर : ६ मिटर ररुदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

# जिल्ह्यातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी मोठ्या संख्येने पुढे या-ॲड.देशमुख

बीड । प्रतिनिधी

प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचारी निगरगट्ट होत चालले आहेत. अनेकांना लाच घेतल्याशिवाय काम करायची सवय राहिली नाही. त्यामुळे अशा लाचखोरांना अडकवण्याचे अँटी करप्शन मधील फिर्यादिंचे धाडस कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ समाज सेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी केले.




दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील अँटी करपशन केसेस करणाऱ्या फिर्यादिंचा सत्कार प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून ॲड. देशमुख बोलत होते. ते पुढे म्हणाले की, लोकसेवकांनी लाज घेणे टाळले पाहिजे. आता त्यांना मोठ्या प्रमाणात पगार आहे. मात्र लाच घेतल्याशिवाय काम करायची सवय उरलीच नाही. साध्या साध्या कामात देखील लाच मागितली जाते. त्यातून संबंधित व्यक्तीची पिळवणूक होते. आणि शेवटी त्याला नाईलाजाने अँटी करप्शन खात्याकडे धाव घ्यावी लागते. त्यामुळे अशांना जागेवर आणण्याचे काम देखील फिर्यादींनी केलं पाहिजे.भ्रष्टाचार विरोधी जनजागृती अभियान तर्फे या कार्यक्रमाचे आयोजन नवनाथ नाईकवादे यांनी केले होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून हमाल मापाडी संघाचे राजकुमार घायाळ हे होते. तर दुसरे प्रमुख पाहुणे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सांगळे हे होते. देशमुख पुढे म्हणाले की, सन २०२४ मध्ये बीड जिल्ह्यात तिस आरोपी पकडण्यात आले. मराठवाड्यात बीड जिल्हा याबाबतीत अग्रेसर आहे. बीडचा क्रमांक मराठवाड्यात एक नंबर वर जातो. त्यामुळे आरोपींना रोखणे ही जबाबदारी फिर्यादींचीच आहे. तक्रार दिल्यानंतर या फिर्यादींनी सामाजिक कामात सातत्याने अग्रेसर राहिली पाहिजे. केवळ एक फिर्याद देऊन भ्रष्टाचार थांबणार नाही. तर या कार्यकर्त्यांनी लोक जागृतीसाठी देखील पुढे आले पाहिजे. तरच भ्रष्टाचार कमी होण्यास मदत होईल. या कार्यक्रमास दोन्ही प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक नवनाथ नाईकवाडे यांनी केले. तर फिर्यादीतर्फे पत्रकार अशोक काळकुटे यांनी मत व्यक्त केले. कार्यक्रमाला तुषार पाटील, भागवत वराट, शेख यासीन पाशा, डॉ. भगीरथ भांड, बलभीम बजगुडे, शिवाजीराव देसाई, पंडित, कैलास राऊत, यांच्यासह फिर्यादी व त्यांची सहकारी उपस्थित होते.

# जिल्ह्यातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी मोठ्या संख्येने पुढे या

## फिर्यादीचे धाडस कौतुकास्पद –ॲड. अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

**प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचारी निगरगट्ट होत चालले आहेत. अनेकांना लाच घेतल्याशिवाय काम करायची सवय राहिली नाही. त्यामुळे अशा लाचखोरांना अडकवण्याचे अँटी करप्शन मधील फिर्यादिंचे धाडस कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ समाज सेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी केले.**




दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील अँटी करपशन केसेस करणाऱ्या फिर्यादिंचा सत्कार प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून ॲड. देशमुख बोलत होते. ते पुढे म्हणाले की, लोकसेवकांनी लाज घेणे टाळले पाहिजे. आता त्यांना मोठ्या प्रमाणात पगार आहे. मात्र लाच घेतल्याशिवाय काम करायची सवय उरलीच नाही. साध्या साध्या कामात देखील लाच मागितली जाते. त्यातून संबंधित व्यक्तीची पिळवणूक होते. आणि शेवटी त्याला नाईलाजाने अँटी करप्शन खात्याकडे धाव घ्यावी लागते. त्यामुळे अशांना जागेवर आणण्याचे काम देखील फिर्यादींनी केलं पाहिजे.

भ्रष्टाचार विरोधी जनजागृती अभियान तर्फे या कार्यक्रमाचे आयोजन नवनाथ नाईकवादे यांनी केले होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून हमाल मापाडी संघाचे राजकुमार घायाळ हे होते. तर दुसरे प्रमुख पाहुणे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सांगळे हे होते. देशमुख पुढे म्हणाले की, सन २०२४ मध्ये बीड जिल्ह्यात तिस आरोपी पकडण्यात आले. मराठवाड्यात बीड जिल्हा याबाबतीत अग्रेसर आहे. बीडचा क्रमांक मराठवाड्यात एक नंबर वर जातो. त्यामुळे आरोपींना रोखणे ही जबाबदारी फिर्यादींचीच आहे. तक्रार दिल्यानंतर या फिर्यादींनी सामाजिक कामात सातत्याने अग्रेसर राहिली पाहिजे. केवळ एक फिर्याद

पान ३ वर

# भतानवाडीत चोरट्यांनी दोन घरे फोडली; सव्वातीन लाखांचा ऐवज लंपास

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील भतानवाडी येथे अज्ञात चोरट्यांनी दोन घरे फोडली. अंगद राम भताने आणि ईश्वर पांडुरंग भाताने यांच्या घरातून चोरट्यांनी सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ३ लाख २७ हजारांचा मुद्देमाल लंपास केला.



अंगद राम भताने हे भतानवाडी येथे शेती करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. सोमवारी (दि.२७) भताने यांची पत्नी आणि मुलगी गंगाखेड येथे गेले असल्यने ते घरी एकटेच होते. रात्री शेताला पाणी देण्यासाठी घराबाहेर पडणार असल्याने त्यांनी घराचे मुख्य गेट उघडे ठेवले होते. रात्री भताने आपल्या रूममध्ये झोपले असताना, त्यांना कोणीतरी गेटमधून आत आल्याचा आवाज आला. त्यांनी दरवाजाजवळ जाऊन पाहिले असता, तोंडाला बांधलेला आणि हातात चाकू असलेला एक माणूस दिसला. त्याच्यासोबत आणखी तीन अनोळखी इसम बाहेर उभे होते. भताने घाबरून रूमचा दरवाजा आतून बंद केला. यावेळी चोरट्यांनी त्यांच्या घरातील दोन पेट्या आणि एक बॅग चोरून नेल्या. तसेच, त्यांच्या घराच्या पाठीमागे राहणारे ईश्वर भताने यांच्या घरातूनही चोरट्यांनी ऐवज लंपास केला. दोन्ही घरातून चोरट्यांनी सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ३ लाख २७ हजारांचा मुद्देमाल घेऊन पोबारा केला. बर्दापूर पोलीस या घटनेचा तपास करत आहेत. दरम्यान, या घटनेमुळे भतानवाडी गावात भीतीचे वातावरण पसरले आहे. गावकऱ्यांनी पोलिसांना लवकरात लवकर चोरट्यांना पकडण्याची मागणी केली आहे.

# चैतन्य धर्मनाथ बीज महोत्सव व प्राणप्रतिष्ठा कलशारोहन कार्यक्रम

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी ग्रामदैवत चैतन्य धर्मनाथ मंदिर बीज महोत्सव व प्राणप्रतिष्ठा कलशारोहन कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. त्यानिमित्त दि.३०/०१/२०२५ रोजी चैतन्य धर्मनाथ यांची मुर्तीची प्राणप्रतिष्ठा निमित्त होम हवन इ. होणार आहे. व दि. ३१/०१/२०२५ रोजी चैतन्य धर्मनाथाच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा व कलशरोहनाचा कार्यक्रम होणार आहे. त्यानिमित्त भव्य महाप्रसादाचे आयोजन दुपारी २ ते ५ या वेळेत केले आहे. तरी भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे अवाहन राजेभाऊ कुमावत व अच्युतराव लाटे, रामेश्वर जमदाडे, भगवान शेजुळ, लहुराव जोगडे, दत्ता येवले, अशोक शेडुते, सुदामराव आगे, वैभव घोडके, गणेश राठोड, गणेश घाटुळ, ओमप्रकाश राठोड, बजरंग कुमावत, नरेंद्र डुकरे, रामभाऊ दराडे यांनी केले आहे.



# पत्रकार एकता रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी व्हा : एस.एम.देशमुख

## पुणे ते सेलू पत्रकार एकता रॅली निघणार

मुंबई । प्रतिनिधी

परभणी जिल्ह्यातील सेलू येथे मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने होत असलेल्या पुरस्कार वितरण सोहळा आणि तालुका अध्यक्षांचा मेळाव्याच्या निमित्तानं ३१ जानेवारी रोजी पुणे ते सेलू अशी पत्रकार एकता रॅली निघणार असल्याची माहिती परिषदेच्या प्रसिध्दी पत्रकात देण्यात आली आहे..एस.एम.देशमुख पत्रकार एकता रॅलीचे नेतृत्व करणार आहेत.



३१ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ८ वाजता पुण्याजवळ पेरणे फाटयावरील शरद पाबळे यांच्या निवासस्थानापासून एकता रॅलीला सुरूवात होईल.. शिक्रापूर मार्गे रॅली रांजणगाव येथे पोहचेल.. तेथे स्वागत आणि दर्शन घेऊन रॅली शिरूर मार्गे अहिलयानगरला पोहोचेल.. तेथे स्वागत आणि विश्रांती नंतर रॅली कडा, आष्टी, जामखेड, पाटोदा मार्गे बीडला जाईल.. वरील सर्व ठिकाणी स्थानिक पत्रकार आणि गावातील प्रतिष्ठित रॅलीचे स्वागत करतील.. बीड येथे रेस्ट हाऊसवर रॅलीचे स्वागत केले जाईल.. तेथून वडवणी, तेलगाव, माजलगाव, पाथरी मार्गे रॅली सेलू येथे पोहोचेल.. सेलूत स्वागताध्यक्ष आणि स्थानिक संयोजन समितीच्यावतीने रॅली आणि एस.एम.देशमुख यांचे स्वागत करण्यात येईल. मार्गावरील तालुका जिल्हा संघाचे पदाधिकारी देखील रॅलीत सहभागी होतील. रॅलीत विश्वस्त शरद पाबळे, उपाध्यक्ष गणेश मोकाशी, आणि पदाधिकारी मोठ्या संख्येनं सहभागी होत आहेत..

पत्रकारांच्या हक्कासाठी आणि चौथ्या

पान ३ वर

# पाटोदा कृषी सहाय्यकाची मनमानी, सतत गैरहजर

**पाटोदा । प्रतिनिधी**

तालुक्यातील कृषी विभागातील तळे पिंपळगाव येथील कृषी सहाय्यक यांचा मनमानी कारभार असून गावात सतत गैरहजर असून शेतकऱ्यांनी विचारले असता शेतकऱ्यांना उडवाउडवीची उत्तरे देत असून तरी जिल्हाधिकारी बीड व ता.कृषी अधिकारी पाटोदा यांनी लक्ष देऊन तात्काळ यांच्यावर कारवाई करण्याची मागणी शेतकरी मिलिंद बळीराम चौरे यांनी केली आहे याबाबत अधिक माहिती अशी की शेतकऱ्याच्या निगडित असणारे कृषी विभाग मात्र पाटोदा येथील कृषी विभागातील कर्मचारी हे सतत गैरहजर असून वेळेवर कोणी कर्मचारी नसुन त्यामुळे शेतकऱ्यांना हेलपाटे मारावे लागतात तर तालुक्यातील मौजे तळे पिंपळगाव येथील कृषी सहाय्यक हे सतत गैरहजर असून गावात येत नाहीत तळेपिंपळगाव मधील ठराविक लोकांना हाताशी धरून कृषी विभागाकडून मिळाली हरभरा व ज्वारी बियाणे हे परस्पर काहींना वाटप करतात काही न करतच नाहीत या बियाण्याची चौकशी करावी व गैरहजर असणाऱ्या वर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी मिलिंद बळीराम चौरे हे आमदार सुरेश धस यांच्याकडे करणार आहेत.

# अबब...! गेवराई तालुक्यात तहसीलदाराने एकाच ठिकाणाहून दिली २५ वेळा मुरूम उत्खनन परवानगी

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यामध्ये रस्त्याचे कामे चालू आहेत यासाठी मुरूम अत्यावश्यक आहे करिता गौण खनिजांचे उत्खनन व वाहतुकीसाठी परवाना देण्याचे अधिकार तहसीलदार यांना ५०० ब्रासपर्यंत, उपविभागीय अधिकारी यांना ५०१ ते २०१२ ब्रासपर्यंत व जिल्हाधिकारी यांना २००१ ते २५००० पर्यंत प्रदान करण्यात आले आहे.

डीसीए इन्फ्रा चकलांबा श्री.अजमेरा यांना मौजे आडपिंपरी येथील ग.नं.व४४ मधून रस्त्याच्या कामासाठी मुरूम उत्खननासाठी

### तहसीलदार गेवराई, मंडळ अधिकारी चकलंबा, तलाठी यांच्यावर निलंबनाची कारवाई करा – जिल्हाध्यक्ष अजय सरवदे

रॉयल्टी भरणा करून मुरूम उत्खननासाठी परवानगी देण्यात आली होती.

गेवराई तहसीलदार खोमणे, मंडळ अधिकारी चकलांबा व तलाठी आडपिंपरी यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करत शासन नियमावलीचे उल्लंघन करत आडपिंपरी येथील गट नंबर ४४ या एकाच ठिकाणाहून ५०० ब्रासच्या २५ वेळेस १२५०० ब्रास मुरूम उत्खननाची नियमबाह्य परवानगी दिली आहे. जिल्हाधिकारी बीड यांचेकडून एकत्रित १२५०० ब्रासची मुरूम उत्खनन परवानगी घेणे अपेक्षित होते सदर प्रकरणी चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी, बीड यांचे दुर्लक्षामुळे गेवराई तालुक्यातील अधिकारी-कर्मचारी भयमुक्त

तहसीलदार गेवराई, मंडळ अधिकारी चकलंबा, तलाठी आडपिंपरी यांच्या संगनमताने

पान ३ वर

# जयदीप गायकवाड यांचे शिव न्युट्रीशन सप्लीमेंट अँन्ड हेल्थ स्टोअर आष्टीकरांसाठी लाभदायी - आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

चित्रपटातील हिरोसारखी आपलीही सिक्सपॅक शरीरयष्टी असावी असे सर्व तरुणांना वाटते परंतु त्यासाठी आपल्याला जिमबरोबर प्रोटीन व्यायामशाळेत (जीम) जाऊन भरपूर व्यायाम करणे तेथील प्रशिक्षकांनी दिलेल्या सल्ल्यानुसार आहार घेणे गरजेचे असते.वयानुसार सर्वांच्याच न्युट्रिशिनल गरजा वेगवेगळ्या असतात.त्यानुसारच सर्वांनी आपल्या फिटनेससाठी दिनक्रम व नियोजन करावे.फिटनेस राहण्यासाठी दररोज किमान १ तास जीम करुन सोबत न्युट्रीशन घ्या असा सल्ला आ. सुरेश धस यांनी दिला.



क-हेवडगांवचे सरपंच तथा कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक परिवंत गायकवाड यांचे चिरंजीव जयदीप गायकवाड यांच्या शिव न्युट्रीशन सप्लीमेंट अन्ड हेल्थ सेंटरच्या उद्घाटन प्रसंगी ते उद्घाटक म्हणुन बोलत होते.यावेळी अँड. वाल्मिकतात्या निकाळजे, नगरसेवक अरुणभैय्या निकाळजे, जि.प.सदस्य सतिशआबा शिंदे, सभापती रमजान तांबोळी,सभापती बद्रीनाथ जगताप,जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे नेते यशवंत खंडागळे, आरपीआय तालुकाध्यक्ष अशोक साळवे,माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, डॉ.शिवाजी राऊत, सरपंच पंडाराजे बुरूडे,माजी सरपंच गंगाधर गायकवाड, बाबासाहेब गायकवाड,

पान ३ वर

# जालना भूमीअभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करा

### पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांना दिले निवेदन

जालना । प्रतिनिधी

जालना भूमीअभिलेख कार्यालयात अनेक वर्षापासून कार्यरत कर्मचाऱ्यांच्या तात्काळ बदल्या कराव्यात, अशी मागणी ॲड. महेश धन्नावत यांनी पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्याकडे केली आहे.

प्रजासत्ताक दिनानिमित्त पंकजाताईंच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण झाले. त्यानंतर ॲड. धन्नावत यांनी त्यांची भेट घेऊन निवेदन दिले. भूमी अभिलेख कार्यालयात शिपायापासून अधिकारी-कर्मचाऱ्यांपर्यंत अनेकजण अनेक वर्षापासून ठाण मांडून बसल्याने गोंधळ झालेला असून, भूमाफिया सक्रिय झाले आहेत. आ. अर्जुनराव खोतकर यांनीसुद्धा भूमि अभिलेख कार्यालयातील संशयास्पद कामकाजाबद्दल नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे या गैरप्रकाराची तात्काळ चौकशी करून अनेक वर्षापासून ठाण मांडून बसलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांची तात्काळ बदली करावी, अशी मागणी ॲड. धन्नावत आणि शाम सारस्वत यांनी पंकजाताई मुंडे यांच्याकडे केली आहे.

# कंत्राट कामगारांचे प्रीपेड स्मार्ट मिटरच्या विरोधात १ फेब्रुवारीपासून काम बंद आंदोलन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

संपूर्ण महाराष्ट्रात स्मार्ट विद्युत मीटर बसवण्याचे काम सूरु झाले असून, यामुळे घरोघरी जावून रिडींग घेवून वीज बील वाटणाऱ्या कंत्राट कामगारांवर बेरोजगारांची कुऱ्हाड कोसळणार असून या निर्णयाच्या विरोधात ०१ फेब्रुवारीपासून काम बंद आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा उपजिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात देण्यात आला आहे.



एम.एस.ई.डी.सी.एल.मीटर रिडींग कंत्राटी कामगार संघटनेच्या वतीने अंबाजोगाई येथील पदाधिकाऱ्यांनी उपजिल्हाधिकारी,वीज उपविभागीय कार्यालय,खा.बजरंग सोनवणे, माजी.आ.पृथ्वीराज साठे यांना निवेदन दिले.या निवेदनात असे म्हटले आहे की,शासन

पान ३ वर

# काशिनाथ ढाकणे यांचे निधन

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील म्हसोबावाडी येथे सर्वाधिक वयविरुद्ध काशिनाथ गणपत ढाकणे वय अंदाजे १०४ च्या दरम्यान होते हे धार्मिक व सांस्कृतिक सामाजिक या सर्व क्षेत्रामध्ये कार्यकर्त होते हे मुंडे समर्थक युवा नेते यांचे आजोबा होते यांच्या पाश्चात एक मुलगा दोन नातु सुना नातोंडे असा परिवार आहे.यांच्या विधानाने पंचक्रोशीतला एक वयोवृद्ध अनुभवी व्यक्ती गेल्यानं सर्व पंचक्रोशीतुन हळहळ व्यक्त आहे.



# बीड जिल्ह्याची कलह प्रियता संपविण्यासाठी संत विचाराची आवश्यकता –धर्मगुरू अमृताश्रम स्वामी

**माजलगाव । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्याची कलह प्रियता संपविण्यासाठी संत विचाराची आवश्यकता असल्याचे धर्मगुरू अमृताश्रम स्वामी यांनी सांगीतले.**

माजलगाव येथील शंकरानंद महाराजांच्या पुण्यतिथीनिमीत्त आयोजित कार्यक्रमात केसापुरी येथील शंकरानंद मठसंस्थान येथे दि. २८ मंगळवारी बोलत होते. यावेळी बोलतांना धर्मगुरू अमृताश्रम स्वामी म्हणाले की, बीड जिल्हा हा संत, महंतांचा जिल्हा म्हणुन राज्यभर नव्हे तर देशभर ओळखला जातो परंतु आज या बीड जिल्ह्यामध्ये जातीय सलोखा हरवत चालला की काय ? अशी भयावह परिस्थिती निर्माण झालेली आहे. परंतु या परिस्थितीवर मात करण्यासाठी व परत जातीय सलोखा नव्याने रूजविण्यासाठी संत विचारांची आवश्यकता असुन गावा - गावामध्ये होणा-या सांस्कृतिक, धार्मीक,



आध्यात्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातुन जातीय तेढ दुर करण्यासाठी संत, महंतांचे विचारच प्रेरक ठरतील असे मत व्यक्त केले तर शहरालगतच असलेल्या केसापुरी येथील शंकरानंद मठसंस्थानाकरीता दानशुर व्यक्तींनी यथाशक्ती आर्थिक योगदान द्यावे असे आवाहनही यावेळी भक्त - गणांना त्यांनी केले. यावेळी केसापुरीचे सरपंच भारत साबळे, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, ज्ञानेश्वर मेंडके, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष उमेश मोगरेकर, कमलेश जाब्रस, युवराज देशमुख, संतोष कोथाळकर, कुमार मुळे, अशोक कान्नापुरकर, पि. सी. देशमुख, अंबादास देशमुख, विनायक रत्नपारखी, डॉ. प्रशांत पाटील, दत्ता महाजन, सतिष तालखेडकर, ॲड. रोहित साबळे, प्रा. निळकंठ साबळे यांचेसह भाविक - भक्तांची व महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. याठिकाणी भागवत कथा तसेच महिलांनी पारायणाचे आयोजन देखील केले होते. स्वामी शंकरानंदांच्या समाधीस अभिषेक करण्यात आला.

# चौसाळ्यात जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी रास्तारोको आंदोलन

**चौसाळा । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देवून ओबीसी मधून आरक्षण देण्यात यावे व ईतर मागण्यासाठी मनोज जरांगे पाटील अंतरवली सराटी येथे (ता.२५) पासून आमरण उपोषणाला बसलेले आहेत. त्यांची प्रकृती खालावत चालल्यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये चिंता पसरली असुन महाराष्ट्र सरकारने त्यांच्या खालवलेल्या प्रकृतीची गांभीर्याने दखल घेऊन सर्व मागण्या मान्य कराव्या यासाठी बीड तालुक्यातील बालाघाटावरील चौसाळा येथे आज (ता.२९) बुधवार रोजी सोलापूर - धुळे राष्ट्रीय महामार्गावर दुपारी १२ वाजता चौसाळा बसस्थानक येथे रस्ता रोको आंदोलन सामाजिक कार्यकर्ते सतिष जोगदंड, बाळासाहेब मोरे, डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सतिष जोगदंड, बाळासाहेब मोरे, डॉ. गणेश ढवळे यांची समायोचित आंदोलनस्थळी



पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# मच्छीमारांच्या नौका, इंजिनची चोरी करणारे दोघे जेरबंद

**भिगवण । प्रतिनिधी**

उजनीतील गरीब मच्छीमारांच्या नौका व नौकेच्या इंजिनची चोरी करणाऱ्या नेवासा तालुक्यातील दोन सराईत चोरट्यांना बेड्या ठोकत साडेआठ लाखांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. जीपीएस प्रणाली व माजी सरपंच यांच्या तत्परतेने या इंजिनचोरीचा छडा लागला आहे.



याबाबत अपर पोलिस अधीक्षक गणेश बिराजदार, बारामतीचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड यांनी भिगवण पोलिस ठाण्यात पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली. दत्तू हिरामण घटे (वय ३८) व रमेश हिरामण गव्हाणे (वय ३७, दोघेही रा. वरखडे, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर) अशी मुद्देमालासह अटक केलेल्यांची नावे आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, दि. २६ ते २७ जानेवारीदरम्यान अनिल नामदेव धुमाळ (रा. धुमाळवाडी, कुंभारगाव, ता. इंदापूर) यांची मासेमारी बोटीला वापरण्यात येणाऱ्या होंडा कंपनीच्या १६० एचपी इंजिन चोरट्यांनी चोरून नेले होते. याबाबतची फिर्याद भिगवण पोलिसात दाखल करण्यात आली होती. दरम्यान, होडीचे इंजिन चोरल्याची माहिती भल्या पहाटे पाचच्या सुमारास कुंभारगावच्या माजी सरपंच उज्ज्वला परदेशी यांना कळताच त्यांनी पोलिसांना माहिती दिली. त्यावरून भिगवणचे सहायक पोलिस निरीक्षक विनोद महांगडे यांनी पोलिस पथक तयार करून तसेच जीपीएस प्रणाली व गोपनीय माहितीचा आधार घेत चोरट्यांचा पाठलाग केला आणि मुद्देमालासह चोरटे हातात आले. या चोरट्यांकडून अनिल धुमाळ यांच्या इंजिनसह इतर मच्छीमारांची चोरीस गेलेली एक लोखंडी होडी, चार बोट इंजिन असा एकूण ८ लाख ३० हजार २०० रुपयांचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे. संबधित संशयित चोरट्यांनी चोरीची कबुली दिल्याचे या वेळी सांगण्यात आले. जीपीएस, सीसीटीव्ही असल्यास त्याचे महत्त्व या चोरीने स्पष्ट केल्याचे सांगण्यात आले. ही कामगिरी ग्रामीण पोलिस अधीक्षक पंकज देशमुख, अपर पोलिस अधीक्षक गणेश बिराजदार, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक विनोद महांगडे, पोलिस उपनिरीक्षक प्रवीण जर्दे तसेच विठ्ठल वारगड, पांडुरंग गोरवे, सुभाष गायकवाड, प्रसाद पवार, सचिन पवार, रणजित मुळीक यांच्या पथकाने केली.

मागील गेल्या वर्ष-दोन वर्षांत उजनी जलाशयातील मच्छीमारांच्या काही होड्या व शंभरहून अधिक होड्यांची इंजिने चोरीला गेली आहेत. एक इंजिनची किंमत ४० हजारांपासून ८० हजार रुपयांपर्यंत असते. साहजिकच, आत्तापर्यंत ५० लाखांहून अधिक मच्छीमारांच्या इंजिनांची चोरी झाली आहे. परंतु, ठरावीक मच्छीमारांनीच पोलिसांत धाव घेतली आहे. इतरांनी मात्र उगीच ससेहोलपट नको म्हणून गप्प राहणे पसंत केले. या घटनेत दोन नव्हे, तर इंजिन चोरीचे मोठे रॅकेट असण्याची शक्यता मच्छीमारवर्गात आहे. याबाबत सखोल चौकशी करण्याची मागणी या वेळी उज्ज्वला परदेशी यांनी केली आहे.

# कंटेनर कारचा भीषण अपघात, तरुणाचा मृत्यू

**फुरसुंगी । प्रतिनिधी**

हडपसर -सासवड राष्ट्रीय महामार्गावर फुरसुंगी पावर हाऊस येथे काल मध्यरात्री कंटेनर व कारचा भीषण अपघात होऊन या दुर्घटनेत कार मधील एका युवकाचा मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही दुर्घटना मंगळवारी मध्यरात्री २.३०च्या सुमारास घडली असून या अपघातात अक्षय बाळासाहेब चीव्हे (वय- ३१, रा. संयोग कॉलनी काळेपडळ/अपेक्षा लॉन्स जवळ पावर हाऊस फुरसुंगी) या युवकाचा अपघातात मृत्यू झाला.

रात्री अडीच वाजण्याच्या सुमारास अक्षय चीव्हे हा स्विफ्ट कार मधून (एम एच १२ एस एल ६७७७) हडपसर कडून फुरसुंगी येथे त्याच्या घरी जात असताना पावर हाऊस फुरसुंगी येथे समोरून येणारा कंटेनर(जी जे १५ ए व्ही ६५८६) ची कारला समोरून जोरदार धडक झाल्याने कारचा चक्काचुर झाला या अपघातात अक्षय गंभीर जखमी होऊन मृत्युमुखी पडले.



या प्रकरणी बाळासाहेब महादेव चीव्हे यांनी काळेपडळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अपघातानंतर पोलीस उपायुक्त संभाजी कदम, पोलीस निरीक्षक जगताप पोलीस उपनिरीक्षक विनायक गुरव, फुरसुंगी वाहतूक विभागाचे पोलीस उपनिरीक्षक माने व कर्मचारी यांनी तत्काळ घटनास्थळाला भेट देऊन परिस्थिती आटोक्यात आणली.

घटनेचा पुढील तपास काळेपडळ पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक विनायक गुरव करत आहेत.गेल्या अनेक दिवसांपासून हडपसर सासवड मार्ग वाहतुकीसाठी प्रचंड धोकादायक झाला आहे रोज या मार्गावर छोटे-मोठे अपघात होऊन निष्पाप नागरिकांचे बळी जाण्याची मालिका सुरूच आहे. तरी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने या मार्गावर सुरक्षेच्या दृष्टीने ठोस उपाय योजना करणे गरजेचे आहे.सध्या या मार्गाच्या रुंदीकरणाचे काम सुरू असून जागोजागी रस्ता खोदला आहे तसेच मुरूम टाकला आहे रात्रीच्या वेळेला यामुळे अपघात घडत आहेत तरी खोदलेल्या ठिकाणी बॅरिकेट्स ,रेडियम, रिफ्लेक्टर लावणे गरजेचे आहे तसेच सुरक्षा रक्षक व वाहतूक नियमन करण्यासाठी सुरक्षा गार्ड नेमून अपघात होणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते संजय थोरात यांनी केली आहे.

# जुगार अड्ड्यांवर कारवाई; तिघांवर गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सराइताकडून चालविल्या जाणार्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धडक कारवाई केली. जुगाराचे साहित्य जप्त करून तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

येरवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जुगार अड्ड्यावर कारवाई करत जुगार अड्ड्याची तोडफोड करण्यात आली. लोणी काळभोर ठाण्याच्या हद्दीत थेऊर फाटा येथील बेटवस्तीत पत्राशेडमध्ये जुगार अड्डा सुरू होता. त्याच्यावरही कारवाई करण्यात आली. सराईत गुन्हेगार ज्ञानेश्वर राखपसरे (४०), किशन टिंगरे (३९), बालाजी माने (३३) यांच्यावर ही कारवाई करण्यात आली. धानोरी येथील जकात नाका येथे मटका जुगार बेकायदेशीर खेळत असलेल्यांवर कारवाई करण्यात आली. याप्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात मंगेश करंजकर (३४) आणि मेहबूब शेख (२३) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सहकारनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मटका जुगार खेळणार्या सचिन थिटे (४०) आणि सुहास डाकले (२४) यांच्यावर कारवाई करण्यात आली. हा जुगाराचा प्रकार पद्मावती येथील वनशीववस्ती येथे सुरू होता.

# केंद्रीय पथकाच्या गाडीसमोर गावकऱ्यांचा ठिय्या; पाहणी न करताच परतत असल्याचा गावकऱ्यांचा आरोप

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील जीबीएस रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. या आजाराने पुणेकरांची चिंता वाढवली आहे. मात्र, या आजाराने घाबरुन न जाण्याचे आवाहन पुणे महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. सिंहगड रोड, नांदेड सिटी परिसरात या आजाराचे सर्वाधिक रुग्ण आढळून आले आहेत. हा आजार दूषित पाण्यामुळे पसरत असल्याची बाब समोर आली होती.



या भागात असलेल्या विहिरीतून दूषित पाण्यामुळे या आजाराचा संसर्ग होत असल्याचे सांगितले जात होते. वाढती रुग्णसंख्या लक्षात घेत आज येथील भागात केंद्राचे ७ सदस्यांचे पथक पाहणी करण्यासाठी येथे आले होते. मात्र, गावातील नागरिकांनी त्यांच्या गाडीसमोर ठिय्या करत पाहणी करायला आला आहात आणि पाहणी न करताच चालला आहात असा आरोप केला. तसेच अधिकाऱ्यांना गराडा घातला होता.

गावकऱ्यांनी विहिरीतील पाण्याची पाहणी करण्याची मागणी केली होती. मात्र, पाहणी न करताच हे पथक जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला होता. पाहणी न करताच निघालो हे कोणी ठरवले. जे काही काम होईल, त्याचे अपडेट देऊ असे या पथकाने महिला अधिकाऱ्याने सांगितले. तसेच पुण्यातील किरकिटवाडी, आंबेगाव, नांदेड गाव भागात जीबीएसचे सर्वाधिक रुग्ण सापडले आहेत. या आजारावर उपयुक्त असलेल्या इंजेक्शनचा काळा बाजारा होत असल्याने पुणे महानगर पालिकेने याबाबत उपाययोजना केल्या आहेत, अशी माहिती या महिला अधिकाऱ्यानी दिली.

**महापालिकेकडून सर्वेक्षणावर भर**

महापालिकेच्या वतीने बाधित भागात घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यात येत आहे. राज्याचे आरोग्यमंत्री प्रकार आबिटकर यांनी देखील येथील बाधित भागाची पाहणी केली. तसेच रुग्णालयात जाऊन रुग्णांच्या तब्येतीची विचारपूस केली. त्यानंतर त्यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेत या भागातील नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी देण्याच्या सूचना देखील केल्या. सध्या पुणे शहरातील जीबीएस रुग्णांची संख्या ही १११ वर जाऊन पोहचली आहे.

# वाहतूक पोलिसांच्या कारवाईस विरोध; अल्पवयीन दुचाकीस्वाराच्या भावाविरुध्द गुन्हा

**पुणे । प्रतिनिधी**

वाहतूक नियमन करताना पोलिस कर्मचाऱ्यास अल्पवयीन दुचाकीस्वाराने विरोध केला. तसेच, त्याच्या भावाने केलेल्या झटापटीत वाहतूक पोलिसाचा मोबाईल खाली पडल्याने नुकसान झाले. या प्रकरणी विश्रामबाग पोलिस ठाण्यात अल्पवयीन मुलाच्या भावाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत विश्रामबाग वाहतूक शाखेतील पोलिस कर्मचारी उमेश नरुटे यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार अल्पवयीन मुलाच्या भावाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजयमाला पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, वाहतूक पोलिसांकडून सोमवारी सकाळी सदाशिव पेठेत विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात येत होती. त्यावेळी अल्पवयीन मुलगा दुचाकीवरून निघाला होता. पोलिसांनी मुलाकडे वाहन परवान्याबाबत विचारणा केली. परंतु त्याच्याकडे वाहन परवाना नसल्याचे आढळून आले. पोलिस कर्मचारी नरुटे या कारवाईचे मोबाईलवर चित्रीकरण करीत होते.

तेव्हा अल्पवयीन मुलाच्या भावाने कारवाईस विरोध केला. या झटापटीत नरुटे यांचा मोबाईल रस्त्यावर पडला. पोलिसांशी असभ्य वर्तन केल्याप्रकरणी विश्रामबाग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वाघोलीत वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या ४० हजार चौरस फूटावर हातोडा; केसनंद फाटा ते आव्हाळवाडी फाट्यापर्यंत संयुक्त कारवाई

**वाघोली । प्रतिनिधी**

महापालिका, पी एम आर डी ए सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग विभाग, वाघोली पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या सुमारे ४० हजार चौरस फूट अतिक्रमणावर वाघोलीत हातोडा टाकण्यात आला. यामध्ये शेड, ओटे, फलक, बांधकामे आदींचा समावेश होता. सहा तासात एवढी कारवाई करण्यात आली.



मंगळवारी वाघोलीत वाहतूक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीने पोलीस आयुक्त अमितेश कुमार, आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्या उपस्थितीत सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक झाली होती. यावेळी आयुक्तांनी चालत पाहणी केली होती. त्यानंतर त्यांनी संयुक्तपणे तात्काळ कारवाई करणार असल्याचे सांगितले होते. त्यानुसार बुधवारी दुपारी एक वाजता केसनंद फाटा येथून कारवाईला सुरुवात करण्यात आली. सायंकाळी सात वाजेपर्यंत सुरू असलेल्या कारवाईत वाहतुकीस अडथळा ठरणारे शेड, ओटे, फलक, बांधकामे अशा ४० हजार चौरस फूट आस्थापनावर कारवाई करण्यात आली. कारवाई शांततेत पार पडली. वाघोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंडित रेजितवाड यांच्या नेतृत्वाखाली मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तर लोणीकंद वाहतूक विभागाचे सहायक पोलिस निरीक्षक गजानन जाधव यांच्या नेतृत्वाखाली अतिक्रमण कारवाई दरम्यान वाहतुकीस नियंत्रण करण्यात आले. मंगळवारी सायंकाळ पासूनच काही व्यावसायिकांनी स्वतः अतिक्रमण काढून घेतले होते. बुधवारच्या झालेल्या अचानक कारवाईचे नागरिकांनी स्वागत केले आहे. गुरुवारी सकाळी आठ वाजल्यापासून पुन्हा पुढील कारवाईला सुरुवात होणार आहे. या कारवाईत एका जेसी बी एस सह सुमारे ५० बिगारी, विविध विभागाचे कर्मचारी, अधिकारी सहभागी झाले होते.

# लग्नाचे वचन देऊन महिलेवर लैंगिक अत्याचार

**पुणे । प्रतितनिधी**

लग्नाचे वचन देऊन एका ३४ वर्षीय महिलेवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. यातून महिला दोनदा गर्भवती राहिल्याने तिला व तिच्या ७ वर्षीय मुलाला जिवे मारण्याची धमकी देत गर्भपात केला. या प्रकरणात आरोपीला अटक करण्याची मागणी पीडितेकडून केली जात आहे.



याप्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून कोथरूड पोलिसांनी दत्तात्रय काळभोर (४३, रा. बावधन) याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पीडितेने दिलेल्या फिर्यादीनुसार, २०२२ साली पीडितेची आणि काळभोर याची एका मैत्रिणीमार्फत ओळख झाली. यानंतर दत्तात्रयने पीडितेला लग्नाचे वचन दिले. यादरम्यान आरोपीने शरीरसंबंध ठेवल्याने पीडिता दोनदा गर्भवती राहिली. यानंतर आरोपीने पीडितेला दोनदा कोथरूड परिसरातील हॉस्पिटलमध्ये नेत तिचा गर्भपात केला.


रुग्णालयाच्या कागदपत्रांवर पीडितेच्या मयत वडिलांच्या नावाने खोट्या सह्या देखील केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान, गुन्हा दाखल करून २० दिवस उलटूनही आरोपी दत्तात्रयला अटक झाली नसल्याने याप्रकरणी महिलेकडून आरोपीच्या अटकेची मागणी होत आहे.

# सायबर फसवणुकीसाठी बँक खाते पुरवणार्या सहा जणांना अटक

**पिंपरी । प्रतिनिधी**

सायबर फसवणुकीसाठी बँक खाती पुरवणार्या सहा जणांना पिंपरी चिंचवड सायबर पोलिस ठाण्याने अटक केली आहे. या कारवाईमुळे सायबर गुन्हेगारांचे धाबे दणाणले असून पिंपरी- चिंचवड पोलिसांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

शुभम मोहन लोंढे (२४, रा. पाटीलनगर, चिखली), सॅम ऊर्फ डेविड ऊर्फ संबीधकुमार श्रीपती नायक (२२, रा. राऊलकिला, उडीसा), प्रोफेसर ऊर्फ हिमांशुकुमार गणेश ठाकुर (२४, रा. हजारीबाग, झारखंड), राजअंश सिंग संतोष सिंग (२१, रा. संगीता हाईट्स, भुगाव, मूळगाव हजारीबाग, झारखंड), गौरव अनिलकुमार शर्मा (४०, रा. बलसाड, गुजरात), अंकुश रामराव मोरे (वय ३१, गंगापूर खेड, नाशिक) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.



पोलिस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सायबर पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याच्या तपासादरम्यान हवालदार हेमंत खरात यांनी आरोपी शुभम लोंढेच्या संदर्भात गोपनीय माहिती मिळवली. शुभमने सायबर फसवणुकीसाठी बँक खाती पुरविल्याचे स्पष्ट झाल्यानंतर, त्याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्याने डेविड ऊर्फ सॅम या आरोपीला खाती पुरवल्याचे कबूल केले.

सॅम हा मागील दोन वर्षांपासून टेलीग्रामद्वारे भारतातील खातेधारकांना संपर्क साधून त्यांची खाती कंबोडियातील मुख्य आरोपींना पुरवत होता. हिंजवडीतून सॅमला अटक केली गेली. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, भुगाव, घोटावडे, भुकूम, बावधन आणि हिंजवडी येथील हॉटेलमध्ये शोधमोहीम राबवून पाच अन्य खातेदारांना ताब्यात घेतले गेले.

राजअंश सिंग याला बावधन येथून अटक केली. तो बँक किट गोळा करून कंबोडियातील मुख्य आरोपींना पाठवायचा. सॅमच्या चौकशीतून कळले की, तो गेल्या दोन वर्षांपासून कंबोडियातील आरोपींसोबत कार्यरत होता. गुजरातमधील बलसाड येथून गौरव शर्मा आणि नाशिकमधील अंकुश मोरेलाही अटक करण्यात आली. ही कारवाई पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे, सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर आयुक्त वसंत परदेशी, उपायुक्त संदिप डोईफोडे, सहायक आयुक्त डॉ. विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक रविकिरण नाळे, सहायक निरीक्षक प्रविण स्वामी, उपनिरीक्षक सागर पोमण, वैभव पाटील, प्रकाश कातकाडे यांच्या पथकाने केली आहे.

# स्त्री म्हणून संसाराचा हक्क या विवाहाने दिला

**नारी द वूमन या संस्थे द्वारा प्रथमच पिंपरी चिंचवड शहरांमध्ये तृतीयपंथीय सामुदायिक विवाह सोहळा संपन्न.....**

**पिंपरी । प्रतिनिधी**

मी मुलगा म्हणून जन्माला आले परंतु एक स्त्री म्हणून मला जगायचे होते. मला माझा संसार थाटायचा होता. आज या विवाह सोहळ्यामुळे मी एक स्त्री म्हणून माझा संसाराचा हक्क प्राप्त केला आहे. माझे स्वप्न आज साकार झाले असल्याचे मत तृतीयपंथीय वधू शिवान्या शिंदे हिने तृतीयपंथीय सामुदायिक विवाह सोहळा प्रसंगी व्यक्त केले.

नारी द वुमन या संस्थेच्या माध्यमातून काळेवाडी येथील बालाजी लॉन्स येथे मंगळवार दिनांक २८ जानेवारी रोजी तृतीयपंथीय पाच जोडप्यांचा सामुदायिक विवाह सोहळा पार पडला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष राज राजापूरकर, नगरसेविका सुप्रिया चांदगुडे, प्रसाद शेट्टी, प्रमोद ताम्हणकर, उद्योजक मल्लीशेठ कद्रापूरकर, हरीश नखाते, गणेश आहेर, गुरुदास भोंडवे, रोहिणी रासकर, रेखा मोरे, सुजाता नखाते, ज्योती निंबाळकर, आशा भोसले, दीपक रोकडे, संतोष माळी, चंद्रकांत जाधव, बाळासाहेब शिंदे,राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष तथा नारी द वुमन संस्थेचे कार्याध्यक्ष भाई विशाल जाधव, नारी द वुमन संस्थेचे अध्यक्ष असिफ शेख, उपाध्यक्षा अर्चना मेंगडे, पवना समाचार चे संपादक नाना कांबळे,



ज्येष्ठ पत्रकार अविनाश चिलेकर, बापूसाहेब गोरे, दादाराव आढाव, शिवशाही व्यापारी संघाचे संस्थापक अध्यक्ष युवराज दाखले, सामाजिक कार्यकर्ते अलकेश त्रिपाठी, मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव गणेश मोकाशी आदी प्रमुख उपस्थित होते.

या सामुदायिक विवाह सोहळ्यात अमन गुप्ता व शिवान्या शिंदे,

गौरव लोंढे व अदनान मणियार,

माधुरी वैरागे व संतोष चव्हाण,

रोहिणी तायडे व धीरज सोनवणे,

आकाश कसबे व उमेश खान या पाच दांपत्यांचा विवाह संपन्न झाला.

सकाळी ११ वाजता साखरपुडा समारंभ पार पडला तर दुपारी तीन वाजता हळदी समारंभ पार पडला सायंकाळी सात वाजता या दांपत्याची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली व अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत विवाह समारंभ पार पडला.

या विवाह संदर्भात बोलताना प्रसिद्ध उद्योजक संतोष भाऊ बारणे म्हणाले की, शिव फुले शाहू आंबेडकर यांच्या महाराष्ट्रामध्ये पिंपरी चिंचवड शहराने अनेक क्रांतिकारी पाऊल उचलून सामाजिक उत्कर्षाचा पदपथ निर्माण केला आहे. हे शहर बेस्ट सिटी म्हणून ओळखले जाते. आशिया खंडातील वास्तव्यास सर्वोत्कृष्ट शहर म्हणून या शहराची ओळख आहे. आज संपन्न झालेल्या या तृतीयपंथीय सामुदायिक विवाह सोहळ्यामुळे समाजातील तृतीयपंथीय वर्गाला सामाजिक न्याय प्रदान करण्याचा धाडसी प्रयत्न झाला आहे.

या नववधूंना मंगळसूत्र प्रदान केलेले सामाजिक कार्यकर्ते अल्केश त्रिपाठी म्हणाले की तृतीय पंथीय व्यक्तीला एक आगळा सन्मान या विवाहमुळे प्राप्त झाला आहे. नगरसेविका सुप्रिया चांदगुडे यावेळी म्हणाल्या की नाना कांबळे अर्चना मेंगडे विशाल जाधव यांनी या विवाहाच्या निमित्ताने सामाजिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली आहे.

उद्योजक मल्लिशात कदरापूरकर या विवाह संदर्भात म्हणाले की हा विवाह सोहळा क्रांतिकारी पाऊल असून दरवर्षी अशा विवाहासाठी आपण मंगल कार्यालय मोफत उपलब्ध करून देणार आहोत.

आमदार शंकर भाऊ जगताप यांनी दिलेल्या शुभेच्छा संदेशात म्हटले आहे की हा विवाह सोहळा पिंपरी चिंचवड चा इतिहासात नोंद होईल असा असून पिंपरी चिंचवड शहराने संपूर्ण देशापुढे आपला नवा आदर्श निर्माण करून दिला आहे.